

# अशीही एक लव्हस्टोरी

अभिजीत पैठणपगारे

# अशीही एक लव्हस्टोरी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अशीही एक लव्हस्टोरी

(कथासंग्रह)

लेखक :

अभिजीत नंदकिशोर पैठणपगारे

लेखकाची ओळख-

**अभिजीत नंदकिशोर पैठणपगारे**



नाव-  अभिजीत नंदकिशोर पैठणपगारे,

रा. औरंगाबाद,

शिक्षण-एम. बी. बी. एस., तिसरे वर्ष,

नायर मेडिकल कॉलेज, मुंबई

ब्लॉग-

abhiabhikhayalayahai.wordpress.com

ई-मेल-abhijeet23896@gmail.co.

मो-9552454038

फेसबुक-https://www. facebook. com/abhijeet. Paithanpagare

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP :

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन : २० ऑगस्ट २०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मनोगत

लहानपणापासून वाचनाची फार आवड होती, आणि हि आवड वडलांकडूनच वारसा हक्काने मिळाली असं म्हणता येईल. साधारण आठवी मधे असताना आयुष्यातील पहिली कविता लिहिली होती. त्यानंतर दोन वर्षे कविता लिहीणं हा जणू छंदच बनला. पण त्यानंतर मात्र 12वी असल्यामुळे मग यामध्ये एक दीड वर्षांचा खंड पडला होता.

बारावी झाल्यानंतर मेडिकल कॉलेजला ऍडमिशन घेतलं. इथं आल्यावर वाटलं होतं की छंद जोपासता येईल, परंतु इथं पूर्णच उलट होतं. त्यामुळे पुन्हा लिखाण सुरु करायला पण एक वर्ष उलटलं.

दुसऱ्या वर्षी मग वर्डप्रेस वर abhiabhikhayalayahai.wordpress.com नावाने स्वतःचा ब्लॉग उघडला, त्यानंतर प्रतिलिपीवर सुद्धा ब्लॉग सुरु केला. प्रतिलीपी वर टाकलेली 'खरं प्रेम' हि कथा प्रसिद्ध झाल्याने मग इतर कथा लिहिण्याला पण प्रेरणा मिळाली.

माझ्या लिखाणाबद्दल सांगायचं झालं तर खूप साधारण लेखक आहे, प्रतिलीप वर काही कथा लिहिल्या आहेत, एक दोन वेळेस कॉलेजच्या नाटकाची स्क्रिप्ट पण लिहिलीये. आता इ-साहीत्य ने सुद्धा संधी दिली आहे त्याबद्दल त्यांचे पण आभार.

अभिजीत पैठणपगारे

प्रस्तावना-

'अशीही एक लव्हस्टोरी', हि कथा आहे विभा या पात्राबद्दल. एक मॉडर्न मुलगी, पेशाने डॉक्टर. तशीही विभा आजकालच्या कोणत्याही मुलीपेक्षा वेगळी नाही. लग्न होऊन काहीच दिवस झाले आहेत आणि अनेक मुलींप्रमाणे तिला पण पडलेला एक मोठा प्रश्न, 'मी योग्य व्यक्ती बरोबरच लग्न केलंय ना? '

मग अशातच विरंगुळा म्हणून मरिन्सला तीच फिरायला जाण, तिचा योग म्हणून तिला तिथे 'त्याची' भेट होणं, आणि भेटल्यानंतर त्याने तिच्या अनेक शंकांचं केलेलं निरसन, प्रेम म्हणजे नेमकं काय? याचा त्याने केलेला नेमका संधिविग्रह, आणि सगळयात शेवटी असणारा सस्पेन्स, हे सगळं वाचताना तुम्हाला नक्की मजा येईल. कदाचित तुम्हाला पडलेल्या अनेक शंकांचं निरसन सुद्धा होईल, आणि हो अभिप्राय नक्की कळवा।।

# अशीही एक लव्हस्टोरी

दुपारचा 12 वाजलेले, तरीही नायर हॉस्पिटलची मेडिसिन ओपिडी पेशन्ट मुळे खचाखच भरलेली होती. पेशन्ट्सना बसण्यासाठी खुर्च्या असूनसुद्धा नंबर लागावा म्हणून त्यांची निरर्थक चालणारी धडपड, आणि त्यात त्यांना शिस्तीत बसवण्यासाठी कंपाउंडरचं ओरडणं यामुळे हॉस्पिटलला जणू मच्छी मार्केटचं रूप आलं होतं. आतमधे 3-4 रेसिडेंट डॉक्टर पेशन्ट चेक करत होते, आणि अर्थातच या गोंगाटामुळे त्यांचंही टेम्पर वाढणं म्हणजे स्वाभाविकच. पण या सगळ्याची सवय असल्याने लक्ष भटकावं म्हणून नेहमीप्रमाणे त्यांची आपापसात हंसी-मजाक चालू होती. मधेच स्टुडंट्सना शिकवणंही सुरु होतं. पण या सगळयांमध्ये आज डॉ. विभा फारच शांत वाटत होती, डोळयावरच्या रेखीव भुवयांवर बोट ठेवून आणि डोळे बंद करून कसला विचार करत होती माहित नाही!!

आणि तेव्हढ्यात एक आवाज तिच्या कानावर आला,

“अगं ए, 'विभा', बराच वेळ झालाय, अजूनसुद्धा ओपीडीच्या बाहेर पेशन्ट्सची लांब लांब रांग आहे, लवकर आवर गं, नाहीतर मॅम येऊन तुला आणि आम्हा तिघांनाही एकदाच झापतील”. तिच्याच एका कलीग म्हणजे डॉ. शुभ्राचा

आवाज होता तो. ते ऐकून विभा थोडी गोंधळूनच गेली. तिने तिच्या मनगटावर असलेल्या घड्याळाकडे पाहिलं. दुपारचा एक वाजला होता. अर्थात खरोखरचं खूप वेळ झाला होता. तिने सकाळपासून पेशन्ट्स सुद्धा फार कमी पहिले होते. ती तेव्हढ्यातच उठली. बेसिन जवळ जाऊन चेहऱ्यावर थोडं पाणी मारलं. समोर आरश्यात बघून स्वतःशीच बोलली,

“विभा सोड तो विचार आता. जे झालंय त्याला कोणी बदलू शकत नाही. आपल्याला स्वतःहूनच हा सो कॉल्ड संसार सांभाळून घ्यावं लागणार आहे. आणि हो आता सध्यातरी कामावर लक्ष दयायलाच हवं. नाहीतर चांगले बोलणे पडतील आपल्याला”

त्यानंतर परत येऊन ती जागेवर बसली. येताना पण तीच स्वतःशी पुटपुटन सुरूच होतं.

“विभा बरी आहेस ना? आज सकाळ पासून वेगळीच वागतेय”, डॉ. शुभ्रा ने प्रश्न केला.

“शुभ्रा अगं आत्ताच तर हनिमून वरून आलीये आपली विभा. त्याच्याच आठवणीत असणार ती. तुझं लग्न झालं ना तर तुलाही कळेल”

हे ऐकून तिथे अचानक हशा पिकला. विभा ने पण थोडं हसण्याचं नाटक केलं आणि परत आपल्या कामात गुंतून गेली. पण डोक्यात एकच विचार होता. आपला त्याच्यासोबत लग्न करण्याचा निर्णय योग्य तर होता ना?

'विभा', मुंबईच्या एका नामांकित मेडिकल कॉलेज मधून MBBS, मुंबईच्या दुसऱ्या एका नामांकित संस्थेतून MD, दिसायला नक्षत्रासारखी असं म्हंटलं तर मुळीच अतिशयोक्ती ठरणार नाही. तिचे ते लांबसडक केस, एखाद्याचा तळहात सुद्धा नसेल एव्हढा गोरा वर्ण, गालावर पडणारी एक गोड खळी, स्माईल तर अशी ना कि बघणारा सगळे दुःखच विसरून जाईल. त्यात तिचा तो गोड आवाज. ऐकल्यानंतर कानात मध ओतावं एव्हढा मधुर. जवळ जवळ म्हणाल ना तर प्रत्येक मुलाची एक काल्पनिक प्रेयसी असते ना तशीच हि विभा।।

सहा महिन्यांपूर्वी विभाचं पोस्ट ग्रॅज्युएशन पूर्ण झालं होतं. आणि आपल्याला तर माहितीच आहे एकदा का मुलीचं शिक्षण पूर्ण झालं का लगेच घरचे लोक तिच्या लग्नाचे आराखडे बांधायला लागतात. विभाच्या बाबतीत पण हेच झालं. तसे विभा चे आई बाबा हे पुरोगामी विचारांचे होते. लव्ह मॅरेजला त्यांची ना नव्हती. त्या बाबतीत त्यांनी विभाकडे तशी विचारणा सुद्धा केली. पण खरं तर भूतकाळातील

काही अनुभवावरून तिचा लव्ह या शब्दवरूनच विश्वास उडला होता. म्हणून तिने त्याबद्दल जास्त काही खुलासा न करता आई बाबांना मुलगा बघण्यासाठी परवानगी देऊन टाकली.

झालं तर मग. बाबांनी विचारपूस करून, ओळख काढून, जातीतलाच, विभासाठी योग्य राहील असा पेशाने डॉक्टर असलेला मुलगा बघितला.

झालं तर मग. काही दिवसांनी तो मुलगा विभाला बघायला आला. रंगाला थोडा गव्हाळ, उंची बऱ्यापैकी चांगली, विभाप्रमाणेच डॉक्टर, घरची परिस्थिती खूप श्रीमंत तर नाही पण तशी चांगलीच. बोलण्यावरून तसा जरा जास्तच शांत वाटला. पण तरीपण जेव्हढं बोलला त्या बोलण्यातून 'तहजीब' झळकत होती. खरं तर त्याला नकार द्यावा अशी काहीच कमी नव्हती त्याच्यात. तो मुलगा पण मुंबईच्या जसलोक हॉस्पिटल मध्ये सर्जन होता. मग काय पसंती झाली. आणि ४-५ महिन्या नंतरची लग्नाची तारीख निघाली. एकदम टिपीकल अरेंज मॅरेज जुळलं होतं ते. दोघांनीही जणु स्वतःच्या भविष्याचा विचार करून लग्नाचा निर्णय घेतला हे स्पष्ट दिसत होतं.

विभाच्या बाबांनी मुद्दाम लग्नाची तारीख जरा उशिरा काढली होती. त्यांच्या मते हा काळ खूप महत्त्वाचा असतो. याच काळात एकमेकांचा स्वभाव,

आवडी निवडी, आणि मुख्य म्हणजे एकमेकांशी वेव्हलेंग्थ जुळवून घेता येते. विभा ने त्यांच्या या निर्णयात पण होला हो केलं.

'पण खरंच 6 महिने पुरे असतात एका व्यक्तीला जाणून घेण्यात? ' विभाला पडलेला हा मोठा प्रश्न. कारण 'सौरभ'ला जाणून घेण्यात तिला अगदी पूर्ण तारुण्य सुद्धा कमी पडलं होतं. 'सौरभ' म्हणजे विभाचा एक्स बॉयफ्रेंड... ज्याच्यासोबत तिने पूर्ण आयुष्य व्यतीत करण्याचे स्वप्न बघितले होते. पण त्यांच्या नात्याचा शेवट सुद्धा कोणत्याही टिपीकल कपल सारखाच झाला होता.

असो. इकडे त्या 6 महिन्यात विभा आणि तिच्या ठरलेल्या नवऱ्याचं बऱ्याचदा बोलणं व्हायचं. कधी मोबाईल वर तर कधी एखाद्या हॉटेल मधे. बरंचसं फॉर्मल बोलणं व्हायचं. एकमेकांच्या आवडी विचारल्या जायच्या. पण का कुणास ठाऊक त्या दोघांमधे जवळीक नसायचीच. जणु ऑफिस मधले दोन लोक मीटिंग करतायेत असा फील यायचा. कदाचित तिच्या होणाऱ्या नवऱ्याचा अबोल स्वभाव याला कारणीभूत असेल किंवा विभा स्वतःच नकळत तिच्या भूतकाळातल्या अनुभवांमुळे इतरांसोबत जवळीक निर्माण करूच शकत नव्हती. तसा विभाचा स्वभावच असा होता ना कि काही झालं तरी ती स्वतःला उदास होऊ नाही द्यायची. हसी मजाक करून वातावरण हलकं करण्याचा तिचा प्रयत्न असायचा. पण या मीटिंग्स मध्ये तिला ते पण शक्य नाही व्हायचं. आपण या नात्यात टिकू ना? असा

प्रश्न तिला बऱ्याचदा पडायचा. पण लग्न झाल्यावर सर्व काही सुरळीत अशीच आशा तिला होती. ... असेच 6 महिने संपले... आणि अखेर दोघांचंही लग्न अगदी थाटामाटात पार पडलं.

विभाला वाटलं होतं की लग्न झाल्यानंतर तरी सर्वकाही सुरळीत होईल. पण त्या दोघांमधे तसा बॉन्ड जुळतच नव्हता. तो स्वभावाने शांत होता त्यामुळे हीला बऱ्याचदा स्वतःहूनच त्याच्यासोबत संवाद सुरु करावा लागे आणि तो पण जेमतेम उत्तर देऊन मोकळा होऊन जात असे. ना कसल्या प्रकारची केमीस्ट्री, ना दोघांची वेवलेंग्थ जुळत होती. कुठे बाहेर फिरायला गेलं तरीसुद्धा बोलण्यापेक्षा इतर व्यक्तींचं निरीक्षण करण्यातच दोघांचाही वेळ जाई.

असं म्हणतात की नवरा बायको च नातं भांडणं झाल्यावर अजून घट्ट होतं. म्हणून एकदा तर हिने विनाकारण भांडण पण सुरु करून बघितलं. भांडणासाठी कारण पण फारच क्षुल्लक होतं. त्याच कारणाने का होईना नवरा बायको असल्याची फिलींग्स तर येईल हा त्या मागचा हेतू होता. पण त्याने सरळ तीन वेळा सॉरी म्हणून तिच्या या प्लॅन वर सहज पाणी ओतलं होतं. तिला भयंकर राग यायचा त्याच्या या सरळ वागण्याचा. ती नेहमीच तिच्या नवऱ्याची 'सौरभ' सोबत तुलना करायची(बायकांची नेहमीची सवय)

अशातच तिला तिने तिच्या बॉयफ्रेंड सोबत केलेली मजा आठवायची. त्या दोघांच मिळून त्याच्या बाईकवर बाहेर जाणं. रात्रभर व्हाट्सअप वर केलेली चॅटिंग. वाढदिवस असताना त्याने तिला दिलेले गिफ्ट्स. छोट्या छोट्या कारणावरून झालेले त्यांचे भांडणं. मग नंतर आलेला रुसवा. तो रुसवा कमी करण्यासाठी मग केलेल्या विनवण्या, वगैरे वगैरे सगळंच. पण तिच्या या लग्नाच्या नात्यात तसं काहीच नव्हतं. कुठेतरी फेल झाल्यासारखं वाटत होतं.

तशी विभा हि एक स्ट्रॉंग मुलगी होती. मेडिकल कॉलेज मधे पण डिप्रेशन यावं असे अनेक क्षण तिच्या आयुष्यात आले होते. आणि यातून बाहेर निघण्यासाठी ती नेहमी पर्याय शोधायचीच. विभाचं एक ठरलेलं असायचं. आयुष्यात कधीही जर का निराशा आली. कधी खुप आनंदाचे क्षण आले तर ती का कुणास ठाऊक पण सरळ मरीन ड्राइव्ह वर जाऊन बसत असे. आजूबाजूला कितीही गर्दी असली ना तरी त्या ठिकाणी ती आणि समोर अथांग पसरलेला सागर या दोनच गोष्टी दिसायच्या तिला. स्वतःशी गप्पा मारत बसायची ती.

तसं मलाही वाटतं कि प्रत्येकाने स्वतःसाठी थोडा तरी वेळ काढलाच पाहिजेल. स्वतःशी भांडलही पाहिजेल. काय ना दुसऱ्यांचे मन जपता जपता, दुसऱ्यांना ओळखून घेता घेता स्वतःलाच विसरून जातो!

असो आजही विभा तिथेच अली होती आणि नेहमी प्रमाणे स्वतःशी गप्पाही मारत होती.

“आपण सौरभ(तिचा जुना बॉयफ्रेंड)ला सोडून कदाचित चुकलो तर नाही ना. पण सौरभच तर होता जो ऐनवेळी लग्नाला नाही म्हंटला……त्याला कदाचित आपल्यातला इंटरेस्ट गेला असणार…. तसंही मला नाही वाटत त्याचं माझ्यावर खरं प्रेम होतं ते…पण आता काय, आपल्या नवऱ्यापेक्षा सौरभ खुपच परवडला असता… …किमान कुणा रोबोट सोबत राहतोय अशी फ़िल्लींग्स तरी नसती आली. पण आता काय करणार? यातून काहीतरी मार्ग काढलाच पाहिजेल”

आणि पुन्हा विचारात गढून गेली.

त्यावेळी तिथे बऱ्यापैकी गर्दी जमलेली होती. प्रत्येक प्रकारचे लोक तिथे होते. त्या गर्दीतही तिला जाणवलं की कोणीतरी तिच्याचकडे टक लावून बघतंय (म्हणतात ना मुलींना या बाबतीत सिक्स्थ सेन्स असतो ते), ती सुंदर असल्याने तिला असले बरेच अनुभव अंगवळणी पडले होते. म्हणून तिने दुर्लक्षित केलं. बराच वेळ झाला तरीपण ती व्यक्ती फारच टक लावून तिच्याकडे बघत होती. तिने डोळयाच्या एका कोपऱ्यातून नेमकं कोण आहे याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी तो चेहरा ओळखीचा वाटत होता. पण उगाच जाऊन त्याच्याशी बोलण्यात तिला रस नव्हता. अर्धा तास झाला होता दोघेही जागचे हलले नव्हते आणि तेव्हढ्यात 'तो'च तिच्याजवळ येऊन बसला. खरंतर हे जरा अनपेक्षितच होतं. ती जरा अस्वस्थ झाली

विभा ने त्याच्याकडे एक कटाक्ष टाकला. त्याची अन तिची धीरगंभीर नजर जुळली आणि तो म्हणाला

“हाय, मी आकाश तुझा क्लासमेट होतो, ओळखलं ना मला? “

विभा जरा वेळ अचंबित होती.

“ओळखलं म्हणजे काय? तुला कस विसरणार? फक्त तेव्हापेक्षा जरा वेगळा दिसायला लागला आहेस तू”

“तू इथे मला एव्हढयात बऱ्याचदा दिसते. तीन दिवस झालेत. तुला इथे बघतो आहे. तुझ्याशी येऊन आधीच बोलावं असं वाटत होतं. पण मनात विचार

यायचा कि कदाचित तू मला विसरलीस तर नाही ना? पण आज राहवलं नाही. म्हंटलं तुझ्याशी बोलाव थोडंफार”

“काहीही काय!क्लासमेट्सला कस विसरणार!!आणि एक मिनिटं. मला बऱ्याचदा बघितलं आहेस म्हणजे तू पण नेहमी इथे येतोस का?

“हो, नेहमीच येतो. निराश झाल्यावर!! काय ना इथं आल्यावर मला स्वतःशी खूप वेळ बोलता येत. मी माझ्यातल्या खऱ्या माणसाला इथेच जाणून घेतो. बरं माझं सोड तुझं सांग, फार बदलली आहेस. आता काय चालूये? “

“काही नाही रे. तेच प्रत्येका सारखंच. 2 महिन्यांपूर्वी लग्न झालंय आणि आता संसाराचा रहाटगाडगा ओढणं चालूये. बाकी काही नाही”

“रहाटगाडगा काय!!(आणि जोरजोरात हसायला लागतो), म्हणजे कुठेही गेलं तरी पळसाला पाने तीनच. असंच म्हणावं लागेल. हो ना? “

“हो तसही म्हणू शकतोस तू।”

“विभा, तुला एक सांगू का? चिडणार तर नाहीस ना? “

“सांग ना, नाही चिडणार मी”

“तुला कदाचित माहित नसेल पण कॉलेजला असताना माझं तुझ्यावर खूप मोठं क्रश होतं. माहित नाही का!! पण खूप आवडायची तू मला!”

ते ऐकून विभा अचानक शांत झाली. दोघांमधे 2 मिनिटांसाठी जीवघेणी शांतता पसरली होती.

“सॉरी, मी तुला कदाचित हे सांगायला नको होतं”

तेव्हढ्यात ती मोठ्याने हसायला लागली.

“तू अजून पण तसाच वाटतोस रे. तेव्हापण कधी कुणाशी स्वतःहून जास्त बोलायचा नाहीस. तुझे ते एक्सप्रेशन्स सेम तसेच. आणि हो ते क्रश बद्दलच मला थोडंफार माहित होतं ही. पण तू माझ्यावर लाईन मारतोय असं कधी वाटलंच नाही म्हणून मला ते खोटं वाटायचं. “

“बरं झालं हसलीस. नाहीतर तुझी ती आधीची शांतता बघून वाटलं मारतेच काय आता तू!!”

“ते सोड पण हे मला तू आता का सांगतोय? “

“अगं गैरसमज नको करून घेऊस. माझं सुद्धा लग्न झालंय. पण असते ना मनात एक खन्त कि कॉलेजच्या त्या रंगीत दिवसांमध्ये चुकून एक मुलगी आवडायची आणि तिला मी हे कधीच सांगू नाही शकलो ते”

“पण तुला माहिती होतं ना कि मला एक बॉयफ्रेंड होता? “

“म्हणजे काय!! माहितीच असणार ना. तुला कदाचित माहित नसेल पण सुंदर मुलीं पेक्षा सुंदर मुलींचे असणारे घोचू बॉयफ्रेंड जास्त फेमस होतात.”

“एक मिनिट, व्हॉट डू यु मीन? तुला सौरभ घोचू वाटायचा? “

“नाही ग फक्त गम्मत केली तुझी. काय असत माहितीये का!! 'ज्या कुणाला कोलीत भेटत ना त्याला माकड बोलण्याची प्रथा आहे आपल्या समाजात'. म्हणून आपलं पाडलं होतं त्याच नाव. राग नाही ना आला? “

“नाही रे आणि तसाही तो माझ्या आयुष्यात नाहीये आता. अरे आकाश आता संध्याकाळचे 8. 30 झाले आहेत मला जायला हवं. “

“इतक्यात? मला वाटलं एवढ्या दिवसांनंतर आपण भेटलो तर मस्त बोलत बसलो असतो”

“अरे सॉरी. तशी माझी पण इच्छा आहे पण काय करणार ना आता माझं लग्न झालंय. एवढ्या वेळ नाही बसू शकत मी “

“अरे बापरे!!नवरोबा चांगलेच कडक दिसतायेत. “

“मुळीच नाही. खरं तर जरा जास्तच शांत आणि समजुतदार आहे तो “

“अच्छा, म्हणजे दोघांच सुरळीत चालू आहे तर. पण मॅडम तुमचे डोळे खोटे नाही बोलत हो”

“तुला बरं माहिती माझ्या डोळ्यांबद्दल”

“माहिती!!!! अगं तुला म्हंटलो ना एकतर्फा प्रियकर होतो मी. डोळे आणि चेहरा बघून तुझा पुर्ण दिवस कसा गेला याचा अंदाज लावायचो मी”

“हे जरा अती होतंय. हा ट्राय कदाचित कॉलेजच्या दिवसांमध्ये चालला असता. पण आता कसाच नाही!!ओके बाय”

“उद्या येशील ना? पुन्हा गप्पा ऐकायला? तसही तुझ्याशी बरंच काही बोलायचं आहे.“

“उद्या? शक्य नाहीये”

“मी वाट बघेन”

“ईट्स युअर चॉईस”

फक्त 15 मिनिटे चाललेला तो संवाद होता. पण घरी जाईपर्यंत विभाच्या मनात तेच चालू होतं. गालावर खूप दिवसांनी हसू आलं होतं. तिची ती मनाला भुरळ घालणारी खळी आज पुन्हा दिसत होती. खरंच त्या एका व्यक्तीने एव्हढा प्रभाव टाकला होता का? हो पण तो प्रभाव चांगला का वाईट हे जाणण्या इतपत ती हुशार नक्कीच होती.

खरंतर तसं आकाश सोबत तीचा आधी एव्हढा संबंध नाही यायचा. म्हणून त्याच्यासोबतच्या भेटीने तिला एव्हढा फरक पडायला नव्हता पाहिजेल. पण खूप दिवसांनी कुणासोबत तरी ती मोकळ्या मनाने बोलली होती।।त्याचा प्रभाव तर तिच्यावर पडणारच ना..

दुसरा दिवस उजाडला होता. आज विभाच रुग्णांशी बोलणं. त्यांचा उपचार करणं यात खूपच पॉसिटीव्ह फरक पडला होता. जेवण करताना तर आकाशचा तो चेहराच समोर येत होता।। ती स्वतःला प्रश्नही विचारत होती की खरंच आज पुन्हा जावं का मरीन ड्राइव्ह ला?

कदाचित या गोष्टीचा वेगळाच फरक तर नाही ना पडणार?

पण तिला त्याच्याशी बोलून बरं वाटलं होतं. आणि परत त्याचं तिच्यावर असणार क्रश वगैरेमुळे तिला मजा पण येत होती. पण तिला वाटलं नको जायला आज. उगाचच या गोष्टींचे वेगळे अर्थ निघतील. तिने उर्वरित काम पटापट आवरून घेतलं आणि सरळ घरी गेली. घरी गेल्यावर तिने बराच वेळ वाट बघितली पण आज तिचा नवरा घरी काही लवकर आलाच नाही. तसं दोघांमधे उशिरा येणं किंवा

यासारख्या इतर गोष्टींवरून कधी भांडण नव्हतं झालं. आज पण तेच दोघेही वाद न घालता चुपचाप झोपी गेले.

आज त्या मरीन ड्राईव्ह वरच्या घटनेला 3 दिवस झाले होते. ती त्याच गोष्टीचा विचार करतच होती तेव्हढ्यात फोन खणखणला. नवऱ्याचा कॉल होता तो

“हॅलो विभा. आज पण कालप्रमाणे घरी यायला मला उशीरच होईल. आणि हो मी बाहेरूनच जेवण करून येईल. तू काळजी करू नकोस”

तिने होकार देऊन फोन कट केला. आता तर घरी जाऊन पण पुन्हा एकटंच बसणं होतं म्हणून आज तिला पुन्हा मरिन्सला जावं वाटल.

तिला मनोमन वाटत होतं की आज पण आकाश असावा तिथे. पण आपण 3 दिवस गेलो नाहीये. तो थोडी ना येईल आता. पण जाऊ दे. जाऊन ते बघू. असला तर गप्पा मारता येईल. आणि नसलाच तर आहेच आपला सूर्यास्त.

मग काय उरलेलं काम लवकरात लवकर आटपून ती थेट गेली ते मरीन ड्राइव्ह ला. आणि आजही आकाश आधीच तिथे बसलेला होता. तिला आनंद तर फार

झाला होता. पण तसं काही चेहऱ्यावर येऊ न देता ती सरळ त्याच्या बाजुला जाऊन बसली.

त्याने तिच्याकडे एक कटाक्ष टाकला आणि समोर पसरलेल्या अथांग समुद्राकडे बघत बसला.

बराच वेळ दोघांमधे शांततेच साम्राज्य होतं. हळूहळू सूर्य पाण्याआड लुप्त होत होता. आजूबाजूला थोडीफार गर्दी पण होती. एका ठिकाणी मित्रमैत्रिणींचा ग्रुप वाढदिवस साजरा करत होते. काही पर्यटक फोटो काढण्यात गुंग होते. तेव्हा तिथे जवळच एक प्रेमयुगुल बसलेलं होतं. ते बघून अचानक विभा आकाशला बोलली.

“मी आणि सौरभ इथे बऱ्याचदा यायचो. हातात हात पकडून हा सूर्यास्त बघत बसायचो. तसं त्याला या ठिकाणी नेहमी यायला आवडायचं नाही. गर्दी असते ना. पण मला समुद्र फार आवडतो. म्हणून माझा नेहमी इथे येण्याचा हट्ट असायचा”

“मुंबईत समुद्र असलेले बरीच ठिकाणं आहेत. तरीसुद्धा इथेच? “

“अरे खरं तर मला माणसं जाणून घ्यायला पण खूप आवडतं रे. इथे बघ ना किती नाना प्रकारचे लोक आहेत. कुणी टेन्शन कमी करायला आलंय तर कोणी

सेलिब्रेशन करायला. कुणी प्रेमप्रकरण सुरु करायला आलय तर कुणी ब्रेक अप करून आकंठ दुःखात बुडायला आलंय. कुणी सध्या आयुष्यातले गोड क्षण अनुभवतंय तर कुणी त्याच भूतकाळातील क्षणांना आठवून आसवं गाळतय. आजूबाजूला बघ ना इथे श्रीमंत पण आहे आणि गरीब पण आहेत. कुणाला जर का कादंबरी लिहायची ना त्याने इथे येऊन बसावं म्हणजे झालं.. …

"व्वा!!खरंच एव्हढा गूढ विचार करतेस तू? तुझी हि बाजू मला कधीच माहित नव्हती"

"माहित नव्हती? म्हणजे तु पण सौरभ प्रमाणे माझं रूप बघूनच मला पसंत कारायचास तर? "

"तसं काही माहित नाहीये गं की तू मला का आवडायचीस ते? आणि तसंही एखादी व्यक्ती आवडायला कारण लागत नाही? फक्त ती फ्रिक्वेन्सी जुळली पाहिजे"

"आणि तुझी फ्रिक्वेन्सी माझ्यासोबत जुळत होती? "

"मला नाही वाटत. अगं सांगायचं झालं ना तर लहानपणापासून मी साहित्याचा फॅन होतो. एकप्रकारे स्वयंघोषित लेखकच. प्रत्येकाप्रमाणे माझ्या मनात पण आपली प्रेयसी कशी असावी याची प्रतिमा होती. आणि विशेष म्हणजे त्यात सुंदरतेला एव्हढा काही थारापण नव्हता. चांगला स्वभाव. साहित्याची आवड. समजुतदार. असे अस्तित्वात नसलेले गुण त्या प्रतिमेत मी ठासून भरलेले होते. पण

आपलं मन ना जगातली सर्वोच्च अशी अनाकलनीय गोष्ट आहे. मन दुसऱ्याला आणि स्वतःला कधी धोका देईल ना ते सांगताच नाही येत. आणि तेच झालं त्या प्रतिमेला. ज्याला मी माझा अहंकारच समजत होतो तो तू तुझ्या या सुंदर चेहरा आणि गोड गळ्यानेच तोडलास”

“म्हणजे तुला म्हणायचं काय? माझा स्वभाव? “

“अगं गैरसमज नको करू. माझं म्हणणं आहे की तू जेव्हा मला आवडलीस तेव्हा मला तुझ्यातले हे गुण कळावे एव्हढा मी तुला ओळखत पण नव्हतो”

“अच्छा, असंय का? , अरे पण मीच का आवडले? माझ्यापेक्षा पण सुंदर मुली आपल्या क्लास मधे होत्याच की”

“आता बुवा मला त्याच स्पष्टीकरण देणं खरंच अवघड आहे.

“”

“एव्हढं सोपं असतं प्रेमात पडणं? “

“अवघडही नसतं. आणि हे मला विचारण्यापेक्षा तू स्वतःला विचार ना. तब्बल दोन वेळा प्रेमात पडलीस. एकदा सौरभ आणि आता तुझा नवरा”

ते ऐकून विभाच्या चेहऱ्यावरचे भावच बदलले.

“ओ मॅडम, काय झालं? “आकाश ने विचारलं

“खरं सांगु? मला तर वाटतं ना कि मी अजून एकदाही प्रेमात पडलेली नाहीये. ते दोन्ही प्रसंग मृगजळच वाटतात रे. एकीकडे माझा बॉयफ्रेंड होता जो फक्त डेटिंग करणं, एकमेकांना गिफ्ट्स देणं यापुढे कधी गेलाच नाही. त्याने माझ्यातल्या खऱ्या मुलीला कधी ओळखलेच नाही. नेहमी वाटायचं सगळं सोडून त्याच्यासोबत फक्त गप्पा मारत बसावं, माझ्या मनात काय चाललंय हे त्याने माझ्या चेहऱ्यावरून ओळखावं, त्याच मन माझ्याकडे मोकळं करावं. ...जशी घरून हॉस्टेलला येताना आपल्याला घरची ओढ लागलेली असतेना तशीच ओढ त्याच्यापासून दूर राहताना लागावी असं वाटायचं... त्याच्यासोबत भांडावं, रुसावं आणि मग काही वेळानं पुन्हा एकत्र यावं......पण आम्ही राहिलो एका टिपीकल कपल्स सारखेच, पूर्ण जगाला आमच्यातल्या दृढ नात्याचे पुरावे देत असताना फक्त 'लॉंग डिस्टन्स रिलेशनशिप' चं कारण देत वेगळे झालो

आणि दुसरीकडे माझा नवरा आहे. आधी वाटायचं की तो मला ओळखतच नाही. आता वाटत कि तो मला माझ्यापेक्षा जास्त ओळखतो. कदाचित त्याला जाणून घेण्यात मीच कमी पडले

आकाश तू लेखक आहेस ना रे! मी असं ऐकलय की बऱ्याचदा सामान्य माणसं ज्या ठिकाणी विचार करणं थांबवतात. तिथून साहित्यिक लोकांचे विचार सुरू होतात. तुला एकच विचारायचं आहे. प्रेम म्हणजे काय रे? “

“खरं सांगू? मला तर वाटत ना कि हे जे लेखक आणि कवी असतात ना, कदाचित माझा सुद्धा त्यात समावेश होत असणार. यांनीच नकळत प्रेमाची चुकीची व्याख्या जगासमोर मांडलेली आहे. कविता असो व दुसरं काही. प्रेमीयुगुलातील प्रेम हे नेहमीच रंगवून व खोटं करून दाखवलं गेलंय”

“काय बोलतोयस काहीच नाही कळालं मला”

“अगं म्हणजे बघ ना, आतापर्यंत प्रेमावर जेव्हढे काही पुस्तक लिहिले गेले, कथा लिहिल्या गेल्या, कविता बनल्या त्यात फक्त असंच दाखवलं गेलं की त्या युवकाने किंवा युवतीने एकमेकांचं प्रेम मिळवण्यासाठी किती धडपड केली, समाजाचा किती विरोध झेलला, आणि शेवटी ते दोघे एकत्र आलेत. या सगळयामुळे आपल्या डोळयात एक कल्पना फिट झालीये कि प्रेम होण्यासाठी असते एक सुंदर मुलगी, एक मुलगा ज्याच्याकडे काही सद्‌गुण आहेत. आणि त्याच्या त्या सद्‌गुणांवर, जसे त्याचा शरीरबांधा, त्याच्यातली डेअरिंग, त्याची संपत्तीसुद्धा, भाळून ती मुलगी त्याला भेटते आणि प्रेमप्रकरण सफल होतं!!!! बस्स झालं एव्हढंच. पुढं काय? काही दिवस, महिने, वर्ष ते सद्‌गुण, त्या मुलीची सुंदरता हुशारी खूप गोड असतात पण त्यानंतर तेच सद्‌गुण दुर्गुण बनतात. ती सुंदरता मग अहंकार वाटू लागते. आणि मग एकमेकांचे जीवलगच तिटकारा करू लागतात!”

“मग एकमेकांवर प्रेम होणार कसं? त्यासाठी थोडंफार आकर्षण तर पाहिजेच ना”

“बरोबर आहे. मी आधीच सांगितलं ना कि एकेकाळी मानवी भावभावनांवर लिहिणारा मी. फक्त सुंदरता असणं हे नाकारणारा मी तुझ्या सुंदरतेवर एकेकाळी भाळलो होतो.

ती न कळणारी फ्रिक्वेन्सी जुळली होती.

प्रेम कुणावरही होऊ शकतं. प्रेम व्यक्त केलंही पाहिजेल. पण खरा प्रॉब्लम ते मिळवतानाच होतो. बऱ्याच वेळेस प्रेम मिळवताना 'मालकीहक्क' डोकावतो. एकमेकांचा एकमेकांवर. आणि मग सुरु होता अतिअपेक्षांचा खेळ. मग रुसवा. हट्ट यातला गोडवा हळूहळू हरवतो आणि त्याची जागा इगो ने घेतली जाते.

बघ ना. अगं एक वेळ तर अशीही येते की आजारी झालेला वृद्ध त्याच्या आयुष्याला, त्याच्या शरीराला, एव्हढंच नाहीतर स्वतःच्या अस्तित्वाला कंटाळून जातो. या तर अशा गोष्टी आहेत की ज्यांना त्याने पूर्ण आयुष्यभर संभाळलेलं असतं. मग विचार कर की जेव्हा एकमेकातलं नातंच जर आजारी पडत असलं तर त्याचा कंटाळा येन किती स्वाभाविक आहे. मग अशावेळी अशी एकच गोष्ट दोघांमधे हवी असते जी एकमेकांना बांधून ठेवेल ती म्हणजे एकमेकांविषयी उत्सुकता. नेहमी एकमेकांना अजून जाणून घेण्याची धडपड. पुस्तकाच्या पानाप्रमाणे उलगडणार

समोरच्याच व्यक्तिमत्व. आणि हि गोष्ट मालकीहक्क आल्यावर अस्तित्वातच राहत नाही. मला वाटत की ती कदाचित त्या खऱ्या प्रेमात असणार. मला वाटत जे खरं प्रेम करतात ना त्यांच्यात ती विचित्र गोष्ट असणारच ज्यामुळे ती उत्सुकता तयार होते पण ती गोष्ट काय असते हे मी काय प्रेम करणारे पण कदाचित सांगू नाही शकणार."

"म्हणजे जर का जुळून आलं. आणि ती एकमेकांना जाणून घेण्याची उत्सुकता जर का राहिलीच तर मी माझ्या नवऱ्याच्या पण? "

"हो, का नाही? "

"अरे पण त्याने तर माझ्याशी अरेंज विवाह केलाय ना मग तर तू म्हणतोस ती मालकीहक्काची भावना असणारच ना तिथे? "

"त्यापेक्षा पण एक मोठी भावना त्याच्याकडे असू शकते आणि ती म्हणजे जबाबदारी. आधीच्या काळात बघ ना अरेंज मॅरेजच होत असे. मग याचा अर्थ त्या नवरा बायको मधे प्रेम नव्हतंच का? उलट बघ ना जोडीदाराचे अनेक पैलू, अनेक गुण कालानुरूप उलगडायचे. तो पती त्याच्या स्त्री साठी प्रथम पुढाकार घेणारा किंवा अधिकार गाजवणारा पती असायचा. मूल झाल्यावर तोच पती काळजी घेणारा सहकारी बनायचा आणि या फेज मधेच बऱ्याचदा ती मालकीहक्काची भावना निघून जायची. नंतर काही वर्षे बायकोच्या ताटाखालचं मांजर पण बनायचा आणि मुख्य म्हणजे आयुष्यतली सगळयात अवघड पायरी म्हणजे वृद्धत्व त्यात तो तिचा बेस्ट फ्रेंड बनायचा. पत्नीचे पण असेच रूप दिसतात.. ...कदाचित हे सुद्धा कारण असणार कि जुन्या काळात बहुतांश लग्न टिकायचे. ...याला बरेच अपवाद पण आहेत. बरीच लग्न

हि बळजबरीने लावली जायची. हुंडा घेतला जायचा. पण जी उर्वरित नाती होती ती मात्र फार टिकायची. आणि त्यांच्यात ती प्रेमाची भावना टिकायची सुद्धा”

“पटतंय रे तुझं. पण मला आहेत काही प्रश्न अजून. नेमकं काय असते ती भावना? काय असत काय खरं प्रेम? शाळेत झालेलं त्या कोवळया वयातील आकर्षण, कि अरेंज मॅरेज झाल्यानंतर हळू हळू पुस्तका प्रमाणे उलगडणारी कोडी? कॉलेजात रूपावर भाळून तयार झालेली अगतिकता, कि 25 विशी ओलांडल्यानंतर असणारी एक मॅच्युरिटी? “

“... खरं सांगायचं तर मी पण कधी खरं प्रेम अनुभवलं नाहीये. ते प्रत्येकाच्या बाबतीत वेगळं असणार पण मला वाटत ते कधीही होऊ शकत. त्या प्रेमाला अर्थ आणि दीर्घता तेव्हाच भेटते जेव्हा ते जुळून येत. ना की जुळवून आणलं जात. ना त्याच्यात कोणत्या प्रकारची बळजबरी असते ना कोणत्या प्रकारची कन्फ्युजन... निखळ असत ते आई आणि लेकराच्या नात्या प्रमाणे. ... कधी कधी ते जुळून जरी नाही आलं ना तरी असत ते नदीच्या दोन काठांप्रमाणे जरी ते जुळू नाही शकलं तरीपण अविभाज्यच. कधी ते भाता होऊन बाणाला आधार देत. तर कधी मूळ बनून स्वतःच आधार बनत. “

हा संवाद झाल्यानंतर अचानक दोघांमधे फार मोठी शांतता पसरली होती. आज प्रथमच विभा समुद्र आणि सूर्यास्त न बघता त्या ठिकाणी डोळे मिटून बसून राहिली होती. तिच्या मनात कदाचित विचारांची नुसती कालवा कालव झाली होती.

आपलं मन पण किती विचित्र असतंय ना. एकाच वेळी भूत, वर्तमान, भविष्य या ठिकाणी सैरवैर धावत. आणि भावनांची मुद्रा ज्यावर उमटते त्या चेहऱ्याला नेमक्या वेळी इतरांसाठी अनोळखी करून टाकत. असं म्हणतात की स्वतःची झालेली वाईट अवस्था लपवण्यासाठी मानाने केलेला हा एक केविलवाणा प्रयत्न. असो इकडे जवळ जवळ 15 मिनिटे दोघेही शांतच बसलेले होते. आणि यावेळी शांतता मोडण्याचा निर्णय आकाशला घ्यावा लागला

“विभा, तू जरा जास्तच विचारात पडलीयेस वाटतं. अगं माझ्यासारख्या अंतर्मुख लोकांचं ना असंच असतंय. कधी बोलत नाही आणि बोलले कि थांबत नाही.

खरं सांगायचं झालं ना तर मी एक असा माणूस आहे ज्याने स्वतः एकही प्रेमप्रकरण केलेलं नाही आणि तरीही निर्लज्जपणे या गोष्टींवर निव्वळ निरीक्षण आणि नको तिथे चालणाऱ्या डोक्याच्या आधारावर मत मांडतो.. ...पण काय करणार ना डोक्यात असल्या गोष्टी एव्हढ्या साठतात ना. आणि जेव्हा तुझ्यासारखा कुणी विचार करणारा भेटला ना कि एकदाच रित्या होतात. हे म्हणजे समोरच्याला पण त्रास आणि स्वतःलाही त्रास. व. पु. काळे म्हणूनच गेलेत ना, 'नो सिंगल फिलॉसॉफर इन द वर्ल्ड इज हॅपी'“

“आकाश फार शब्दांमध्ये फिरवतोस रे तू समोरच्च्याला. तुझ्या बायकोला पण असंच काहीही सांगत असतोस का? “

“सांगतो ग. जेव्हा जेव्हा तिच्या नजरेत बघतो ना तेव्हा तेव्हा तिला काही न काही सांगतच असतो. फार कमी वेळेस शब्दांद्वारे. पण बऱ्याचदा फक्त नजरेतून. कदाचित तुझाही नवरा तुझ्याशी बोलत असणार पण तू समजून घेत नसशील”

आकाश हे वाक्य सांगत असताना ती त्याच्या नजरेतच बघत होती आणि तिला काय झालं काय माहित पण ती अचानक उठली.

“अरे आकाश मला एक महत्वाचा काम आठवलंय मी गेलं पाहिजेल. आज तुझ्याशी बोलून फार बरं वाटलं. योग जुळला तर आपण पुन्हा भेटू इथेच. बाय!!”

आणि ती पुन्हा निघून गेली आणि आकाश तिच्या पाठमोऱ्या आकृती कडे बघत होता।।।।

आजचं ते संभाषण झाल्यावर विभाच्या डोक्यात नुसतं विचारांचं चक्र फिरत होतं. मधेच तिला आकाश ने तिच्या नावऱ्याबद्दल जे सांगितलं ते आठवत होतं. कदाचित त्याच बोलणं तिला पटलं असणार. काय माहिती तिचा नवरा खरंच तोंडाने न बोलता नजरेने तिच्याशी संवाद साधत असणार.

"खरंच आपला नवरा आपल्याशी नकळत त्याच्या नजरेतून संवाद साधत असणार का. छे शक्य नाही. त्याला जर माझ्याशी एव्हढं बोलायचं आहेच तर तो सरळ का नाही बोलत. लग्नाची बायको आहे मी त्याची. कदाचित आपण एखादं पुस्तक वाचल्यावर काही वेळासाठी कस अचानक बदलून जातो. त्याचप्रमाणे त्याच आजच संभाषण ऐकून आपल्याला होत असणार"

पण आजकाल विभा खरंच तिच्या पतीच्या हालचाली. त्याची होणारी नजरा नजर. याकडे नकळत जास्तच लक्ष देत होती. मधेच सौरभ आणि त्याच्यातला फरक शोधून काढत होती. पण तिला ना कधी सौरभच्या डोळयात असं दिसलं होतं ना तिच्या नवऱ्याच्या डोळयात... ...

असो. पण एक चांगली गोष्ट मात्र झाली होती. तिला मन मोकळं करण्यासाठी कुणीतरी भेटलं होतं. मधे मधे बऱ्याचदा तीच आकाश सोबत मरिन्सला भेटनही व्हायचं. आणि या भेटींमध्ये बोलण्याचे विषय पण मस्त रहायचे. मग ते प्रेम असो वा फिलॉसॉफी. एकदा असंच भेटलं असताना तिने त्याला विचारलं

"तू म्हंटला होतास कि तुझा नवरा कदाचित तुझ्याशी संवाद साधत असणार. पण मी बरंच निरीक्षण केलं रे पण मला तसं कधी वाटलंच नाही. तो माझी

काळजी फार घेतो. बऱ्याचदा माझ्याकडून काही अपेक्षाही नसते त्याची. मला तर बाबा यातलं काही कळतच नाहीये. तू याला काय म्हणणार? “

“विभा, मला तर वाटत ना की त्याच प्रेम तो तुझी काळजी घेण्यातूनच व्यक्त करत असणार. आणि आताच तू म्हंटलीस कि तुझ्याकडून तो काही अपेक्षाही ठेवत नाही. कदाचित तो सुद्धा त्याच्या तारुण्यात कुणावर एकतर्फी प्रेम करत असणार. पूर्ण प्रेम एकाच बाजूने, म्हणूनच कदाचित त्याला परतफेडीची सवय नसणार गं

हे असले लोक नेहमीच चुकीचे असतात. माणसाने एकदातरी स्वतःच प्रेम व्यक्त केलंच पाहिजे. सुंदरता, ऐश्वर्य, याचा त्याग करण्यातच पुरुषार्थ ह्या भिकारड्या वृत्तीला तर आपण नकळत मान्यताच दिली आहे. त्यानेही तारुण्यात असताना केवळ हाच खोटा पुरुषार्थ जपत उगाच स्वतःच्या मनाची तरफड केली असणार. “

हे बोलत असताना विभाला त्याच्या नजरेत अचानक एक चमक दिसली. विशेषतः जेव्हा तो म्हंटला कि प्रत्येकाने एकदातरी प्रेम व्यक्त केलंच पाहिजेल.

त्याच्या त्या नजरेचा अर्थ काय होता? त्याला अजून सुद्धा विभा आवडायची का? त्याच्या नजरेतली ती चमक. बोलताना नकळत तिच्या नवऱ्याला

त्याने त्याच्या तारुण्यासोबत केलेली तुलना. या सगळयांचा अर्थ काय होता? त्याच ते वेळ काढून दरवेळी तिला भेटणं. हे सगळं जुन्या आठवणींचा हिंदोळ की अजून सुद्धा तू माझ्या सॉफ्ट कॉर्नर मध्ये राहते याची ती सूचना होती?

बहुतेक या प्रश्नाचे उत्तर त्या दोघानाही माहित नसणार

इकडे आकाश आणि विभा च भेटणं खुपच वाढलं होतं. अगदी दररोज म्हंटलं तरी वावगं ठरणार नाही. आकाश ने विभाला तिच्या पतीच्या नजरेत जे सापडायला लावलं होतं ते तिला आकाशच्या नजरेत सापडत होतं……कधी त्याची नजर तिच्या मनाचा ठाव घेते असं वाटत होतं तर कधी नकळत तिच्या विचारांवर साम्राज्य गाजवते असं तिला वाटायचं. आणि या सगळयात तर ती सौरभला सपशेल विसरलीच होती..

तिने असंच एकदा वाचलं होतं की माणसाने कधीपन अशाच व्यक्तीची साथ घ्यावी जी व्यक्ती तुमच्यावर प्रेम करते. …तिचा पती तसाच होता. आपल्या हातून चुकून विभाच एकदाही मन दुखवू नये याची तो पूर्णपणे काळजी घेत होता. मनाने तर एकदम चांगला.

आणि आता दुसरीकडे होता आकाश. जो बोलण्यानेच त्याच्या विचारानेच तीच जग काही क्षणासाठी का होईना पण पूर्णतः बदलून टाकत होता. तिला जाणवत होतं की ती नकळत आकाशकडे संमोहित झालीये. कदाचित त्याच्या प्रेमात पडलीये.

पण ते योग्य होतं का? विभा तशी समजुतदार होती. आपल्यासाठी कोण योग्य आहे हे तिला कळत होतं. पण मन हि गोष्टच फार विचित्र.

विभाच्या मनाचं पण तेच झालं.

आकाश आणि तिचा नवरा म्हणजे जणू नाण्याचे दोन पैलू असं तिला वाटत होते. पण काटा मात्र आकाश कडे झुकला होता.

काही दिवस झाले आणि तिला कळून चुकलं कि ती खरंच आकाशच्या प्रेमात आहे. कितीही अमान्य केलं तरी ती स्वतःला आता फसवू शकत नव्हती.

"आपण त्याला सांगावं का? आपल्या मनात काय चालू आहे ते!!"

त्यात तिच्या डोक्यात सतत आकाश चे ते शब्द फिरत होते 'कि प्रत्येकाने त्याच प्रेम एकदा तरी व्यक्त केलंच पाहिजे'.

“पण हे योग्य ठरेल का? मला नाही वाटत तो होकार देईल……पण एकदा व्यक्त होण्यात काय चूक आहे? आणि तो तेव्हढा मॅच्युअर वाटतो कि मला समजून घेईल सुद्धा. झालं तर मग उद्याच आपण त्याला आपल्या मनातलं सगळं सांगून टाकू म्हणजे झालं”

असा तिने पक्का निश्चय केला. दुसऱ्या दिवशी आपली कामे जेव्हढी लवकर आटोपता येईल तेव्हढ्या लवकर आटोपले. आज चेहऱ्यावर एक वेगळाच आत्मविश्वास होता. खूप दिवसांनी ती कॉलेजमधे जशी हेअर स्टाईल करायची तशी आज तिने केली होती. ठीक 7 वाजता ती मरिन्सला पोहोचली. अपेक्षेप्रमाणे आकाश तिथे होताच. आणि नेहमीप्रमाणे ती त्याच्या जवळ जाऊन बसली.

“काय मॅडम आज काही स्पेशल आहे काय? कॉलेजातील ती हेअर स्टाईल. मेक अप. याचा अर्थ काय? “

“तुला हीच विभा आवडायची ना? “

“हो. तसही म्हणू शकतेस तू!!”

“तुला आठवत आकाश तू मला म्हंटला होतास कि प्रेम कुणाशीही होऊ शकतं. “

“हो म्हंटलो होतो की”

“आणि प्रेम झाल्यावर एकदातरी व्यक्त केलंच पाहिजेल”

“हो हे पण म्हंटलं होतो. पण हे सगळं आता का विचारते आहेस? “

“मी तेच करायला आज इथे आले आहे रे!!तुझं बोलणं, तुझा स्वभाव या सगळयाने मला जणू भुरळच पडलीये. फक्त दुःख हे आहे की ही सगळी जाणीव आयुष्यच्या चुकीच्या वळणावर झाली. मला माहितीये आपल्या दोघांचंही लग्न झालंय. पण मी स्वतःला बोलण्यापासून थांबवू नाही शकले रे!! खरंच प्रेम करते तुझ्यावर. तूच ठरव तुला स्वीकारता येईल का? “

हे ऐकून खरं तर आकाश अचंबित झाला पाहिजे होता. पण त्याच्या चेहऱ्यावर असे काही भाव होते ना कि जणू त्याला हे असं होणारच आहे हे सगळं माहित असावं.

“तुझ्या भावनांची मी खरंच कदर करतो. उशिरा का होईना पण माझी क्रश मला पसंत करते. पण विभा माझं लग्न झालं आहे. आणि मी माझ्या पत्नीवर खूपच मनापासून प्रेम करतो. तुमच्यासारखीच आमच्यात पण एव्हढी केमिस्ट्री नाहीये. पण तरीही माझ्या जीवपेक्षा पण मला ती प्रिय आहे. मला खरंच माफ कर पण मी आकाश. तुझं प्रेम नाही स्वीकारू शकत”

विभाच्या चेहऱ्यावरचे भाव खरं तर फार बदलले पाहिजे होते. पण उलट तिच्या चेहऱ्यावर आपण काहीतरी मिळवलं आहे असेच भाव होते.

“आकाश, तुझी बायको खरंच खूप भाग्यवान आहे. मला खंत वाटते की हा मरिन्सला भेटलेला आकाश या विभाचा नाही होऊ शकला.

तरीपण तुझ कधीही मतपरिवर्तन झालं तर मला सांग. मी नेहमी तुझी वाट पाहिन, आणि ज्यादिवशी येशील ना तेव्हा एक लाल गुलाब घेऊन ये, मला लाल गुलाब फार आवडतो. “

एव्हढाच संवाद आणि दोघेही निघून गेले. आज जाताना विभाच्या चेहऱ्यावर तणाव नव्हताच. उलट एक स्माईल होती. तिला बहुदा माहित होतं की

आता यानंतर तिला आकाश पुन्हा मरिन्सला भेटणार नाही. पण त्याच्यासोबत आतापर्यंत केलेल्या गप्पा. त्याचा तो चेहरा नुसतं तिच्या डोळयासमोर फिरत होतं.

काही वेळाने ती घरी आली. तिचा फेव्हरिट टीव्ही शो बघत असताना मोबाईल खणखणला. पतीचा फोन होता तो

“हॅलो विभा, मी अर्ध्या तासात घरी येतोय. आपल्याला बाहेर जायचं आहे. तू लवकरात लवकर तयार हो”

“अरे पण कुठे? “

“ते तुला आल्यावर सांगतो. फक्त तू पटकन तयार हो”

आणि फोन कट झाला. विभा ने पटकन तिच्या आवडतीचा ड्रेस बाहेर काढला. लाल कलरचा ड्रेस होता तो. तिच्या नाजूक शरीर बांध्यावर आणि आणि तिच्या गोऱ्या वर्णावर फारच शोभून दिसत होता तो. तशी ती दिसायला फारच सुंदर होती तरीही तिने मेकअप चढवलाच. आणि ती नवरा कधी येतो याची वाट बघत बसली.

दारावर बेल वाजली. तिने जाऊन दार उघडलं आणि समोर बघते तर आकाश उभा होता. आणि विशेष म्हणजे त्याचा हातात लाल कलरचं गुलाबाचं फुल होतं.

दारावरच त्याच ते रुपडं बघून विभा अचंबितच झाली. विशेषतः त्याच्या हातातील फुल बघून काय बोलावे हेच तिला कळेना झालं.

“विभा, असं चकित होऊन काय बघते माझ्याकडे? तूच म्हणालीस ना कि जेव्हा पण तू माझ्या प्रेमाचा स्वीकार करशील तेव्हा एक लाल गुलाब घेऊन येशील ते.

हे बघ असा उभा आहे तुझ्यासमोर मी. काही बोलणार नाही माझ्याशी”

आणि विभा काहीच न बोलता सरळ त्याच्या गळयात पडली. आणि नकळत रडायला लागली. अश्रू होते का आनंदाश्रू माहित नाही पण ती निव्वळ मूलमूल रडत होती

“अगं ए वेडाबाई. रडायला काय झालं तुला? आता आलोय ना मी फक्त तुझ्यासाठी”

“रडू नाहीतर काय करू? खरंतर मी तुझ्याशी बोलणारच नाहीये”

“का? काय झालं? काही तक्रार आहे का माझ्याशी? “

“तक्रार!!!

आकाश. किती फिरवलस रे मला.

एव्हढं प्रेम कारायचास माझ्यावर तर मला तू एक नवरा म्हणून आधीच का नाही सांगितलंस?

का उगाच मरिन्सचा आकाश. माझा जुना क्लासमेट बनून उगाच फिलॉसॉफर बनून प्रेमाची व्यख्या शिकवत बसलास.

सरळ सांगायला प्रॉब्लम काय होता. बायकोचं आहे ना मी तुझी!!!”

“संगायचो ग. माझ्या नजरेतून संगायचो. “

“पण सरळ बोलायचा का नाहीस? “

“हाच तर प्रॉब्लम आहे ग माझा. बोलूच तर शकत नाही ना मी. कॉलेज मध्ये तरुण आकाश म्हणून तरुण विभासोबत बोलू नाही शकलो. त्या तारुण्यात खूप काही होतं मनात. ते कवितेतून उतरवलं सुद्धा. पण दुर्दैवाने तुझ्यापर्यंत पाठवूच नाही शकलो कधी. माझं नशीब जोरावर होतं की अरेंज मॅरेज पण माझं तुझ्यासोबतच झालं. पण लग्नानंतर पण तेच झालं. एक नवरा म्हणून बायको सोबत कधीच बोलू नाही शकलो.

म्हणून मग मी या तारुण्यातल्या आकाशला तुझ्यासमोर आणलं. “

“इतक्या छोट्या गोष्टीसाठी. एव्हढे प्रयत्न!”

“इतकंच नव्हतं ग!मी तुला धैर्य एकवटून कदाचित बोलूही शकलो असतो. पण एक मोठी समस्या होती. तू माझ्याशी बोलताना नेहमी सौरभला माझ्यात शोधायचीस. त्यानंतर आयुष्यभर शोधत बसली असतीस. मला त्यामुळेच आकाश तुझ्यासमोर मांडायचा होता. आणि आकाश मार्फत तुझा नवरा “

“आणि हेच करण्यासाठी मग मला एव्हढं सगळं करावं लागलं. प्रथम वाटलं की तू मला वेड्यात काढशील. पण नंतर तू सुद्धा तुझा रोल सांभाळत होतीस. कदाचित तुला पण तुझा नवरा म्हणजे मी. तुझा क्लासमेट आकाश म्हणजे मीच याच्याकडून समजून घ्यायचा होता. आणि मी तेच केलं. “

“आता यापुढे हे सगळं बंद. आपण दोघेही नवरा बायकोचं आणि तू तुझ्या मनातलं पूर्णपणे मलाच सांगशील. म्हणजे तुझ्या बायकोला.

तुझ्याकडे एकच मागणं आहे माझं. तू पूर्ण करशील ना ते? “

“काय मागणं आहे? मागून तर बघ नक्कीच पूर्ण करेल”

“आयुष्यभर तर तू माझा पती बनून राहणार आहेसच. पण पती म्हणून जगताना तुझ्यातला तो 'आकाश' जप!!!जपशील ना? “

“आकाशला तर जपावच लागेल. कारण शेवटी तोच तर आहे ज्याने तुला तुझा नवरा समझुन सांगितला. पण विभा तुला आकाश नेमका कोण होता हे माहित आहे का? “

“हो !!! एकतर्फी प्रियकर. फिलॉसॉफर. “

“बस्स, तुला त्याची स्टोरी तर नाही ना माहिती,

उद्यापासून तुला तुझा पती सांगेन कि आकाश कोण होता ते. आपण उद्यापासून पुन्हा मरिन्सला भेटू पण नवरा बायको बनून. आकाशला समझुन घेण्यासाठी……येशील ना? “

'मेसेंजर-एक सायन्स फिक्शन'

पुण्याच्या एका नामवंत सॉफ्टवेअर कंपनीत आज एक खास दिवस होता. जंगी पार्टी चालू होती. त्याला कारणही तसंच होतं. भारतातील अनेक प्रसिद्ध कंपन्यांना मागे टाकून यशाचं शिखर गाठलं होतं कंपनीने आणि यासाठी मेहनत घेतलेल्या अनेक कर्मचाऱ्यांचं त्या निमित्ताने स्वागत केलं जात होतं. काहींना तर पुढे येऊन मनोगत मांडण्याची संधी दिली जात होती. बरेच जण स्वतःच मनोगत मांडून गेले होते आणि आता बारी आली होती **'राज'** ची. राज म्हणजे एक उमदा व्यक्तिमत्व. त्याच्या बोलण्याच्या शैलीने तर तो समोरच्याला लगेच आपल करत असे. स्टेज वर आल्या आल्या टाळयांचा गडगडाट सुरु झाला. ऑफिसची बॉस मंडळी त्याच्यावर जाम खुश होती. मुली तर त्याच्यावर एकदम फिदाच असायच्या म्हणून तो काय बोलणार या कडे सगळयांचं लक्ष लागलेलं होतं.

त्याने बोलायला सुरुवात केली. स्वतःच्या यशाचं रहस्य सांगितलं त्याला त्याच्या सहकाऱ्यांनी आणि बॉस ने कशी मदत केली ते सांगितलं आणि शेवटी एक वाक्य बोलला, “जर **निलेश** माझ्या टीम मध्ये नसता तर मला हे सर्व शक्यच झालं नसत”. आणि त्याने निलेशला सुद्धा समोर बोलावलं. निलेश म्हणजे जणू इन्ट्रोव्हर्ट हा शब्दच याच्यासाठी तयार झाला असावा. राजच्या एकदम विरुद्ध. फार मोजक बोलायचा. ऑफिस मधे तर बरेच जण ओळखायचे सुद्धा नाही त्याला. असा हा निलेश

समोर आला आणि फक्त थँक्स एव्हढं म्हणून परत जागेवर गेला. आणि त्यानंतर राजने सुद्धा आटोपत घेतलं. पण जसा तो खाली आला मुलींचा एकच गराडा त्याच्याभोवती पडला. सर्वजणी त्याची प्रशंसा करत होत्या. काही जणी तर चक्क त्याला कॉफी साठी सुद्धा विचारत होत्या पण कशीतरी उत्तर देत त्याने तिथून काढता पाय घेतला आणि सरळ **अंजली** जवळ येऊन उभा राहिला.

बराच वेळ झाल्यानंतर सुद्धा ती काही बोलेना कळल्यावर तोच सुरु झाला

“काय मॅडम आज स्वारी रुसलेली दिसतेय. काही चुकलं का आमचं? “

“नाही तसं काही नाहीये”

“मग आज काहीच बोलत नाहीये. “

“तुला त्या मुलींमधून वेळ मिळेल तेव्हा बोलेन मी तुझ्यासोबत. “

“अच्छा यामुळे का त्रागा बाईसाहेबांचा. तू पण ना! एव्हढा पण विश्वास नाही माझ्यावर. त्या मुलींसाठी काय मी तुला सोडणार आहे काय! त्यांची आणि तुझी कुठे बरोबरी होणार”

“खरचं ना? “

“हो ग बाई. ते सगळं सोड चल तो बघ निलेश इकडेच येतोय. तिघे जाऊन मस्त कॉफी पिऊयात. “

“ व्वा, मित्र आणि गिर्लफ्रेंड दोघांसोबत एकदाच कॉफी पिणार. “

“अगं तुला तर माहितीच आहे की माझ्याशिवाय त्याला दुसरा कुणी मित्र पण नाहीये. बिचारा मी नसलो तर नेहमी एकटाच राहतो”

“ठीक आहे चल”

मग ते दोघेही निलेशला सोबत येण्याचा आग्रह करतात पण अर्थातच तो नाही म्हणतो मग काय शेवटी ते दोघेच निघून जातात. ते दोघेही जास्त काही आग्रह करत नाही कारण राज आणि अंजली दोघांनाही त्याचा स्वभाव माहितीच होता.

निलेशची मुलींसोबत बोलताना बऱ्याचदा त त फ फ व्हायची. फक्त अंजली सोबत तो थोडाफार बोलायचा तेही ती राजची मैत्रीण असल्यामुळे. खरं तर अंजली ने त्याला बरंच बोलकं करण्याचा प्रयत्न केला होता. आणि तसं म्हंटलं तर थोडा फार फरक पडलाही होता तरीपण अनोळखी लोकांशी बोलताना त्याची बोबडी वळायचीच.

असो. इकडे हे दोघेच कॉफी प्यायला आलेत. बऱ्याच गप्पा झाल्यानंतर अंजली ने अचानक निलेशचा विषय काढला

“काय रे त्याचा नेमका प्रॉब्लेम काय आहे? “

“म्हणजे? “

“म्हणजे नेहमी असा शांत शांत का असतो? “

“अगं हा लहान असतानाच बराच अंतर्मुख होता. त्यात अगदीच शाळेत असताना त्याच्या आईवडिलांचा घटस्फोट झाला. आणि तेव्हापासून तो त्याच्या आई सोबतच राहायचा. आई सुद्धा नोकरी करत असल्याने त्याच्याकडे वेळ द्यायला तिला जमायचं नाही. मग काय हा राहिलाच शांत शांत. आमच्या दोघांची ओळख झाली इंजिनीरिंग कॉलेज मधे. प्रथम वर्षालाच तो माझा रूम पार्टनर बनला फारच हुशार होता. जे कोणाला नव्हतं येत ते निलेशला यायचं. आम्ही 4 वर्ष सोबत होतो. आणि योगायोग म्हणजे आता सुद्धा आम्ही एकाच ठिकाणी काम करतो. त्याचा शांतपणा म्हणशील तर तो त्याचा स्वभावच धरून घे”

“अरे पण या गोष्टीचा त्याच्याच मनावर परिणाम होईल ना? “

“होऊ तर शकतोच. पण काय आपण तरी काय करणार…? “

“स्वभाव बदलू शकतो. एक आयडिया आहे”

“काय? पटकन सांग”

“हे बघ तो कसाही असला ना तरी एक पुरुष आहे, आणि तू कोणत्याही पुरुषाचं म्हणशील तर तो कितीही रागीट, कडक स्वभावाचा असला ना तरी एखादी सुंदर मुलगी दिसली तर एकच मिनिटात पघळून जातो, आपल्याला तर फक्त निलेशला बोलकं करायचं आहे ना? “

“हट, काहीपण, सगळे पुरुष नसतात असे”

“बिलिव्ह मी, सगळे पुरुष सारखेच असतात, “

“बरं ठीक आहे मानली तुझी गोष्ट तरी आता सुंदर मुलगी कुठून आणायची?“

“आणायची नाही रे, त्याला कोणीतरी नक्कीच आवडत असणार बघ, आणि तू तर त्याचा बेस्ट फ्रेंड तुला तर माहितीच असेल ना? “

“हो तशी मुलगी आहे एक, त्याला आवडते का हे माहित नाही पण तिच्याकडेच नेहमी एकटक बघत असतो तो”

“(कुतूहलाने) कोण आहे ती? “

“अगं ती त्रिशा म्हणजे शलाका, “

“अरे बापरे, तिच्याऐवजी कुणीही असली असती तर लावताही आली असती रे सेटिंग, पण शलाका, माय गॉड, फारच नकचढी आहे रे ती, तिच्याशी साधं बोलायला सुद्धा निलेशला वर्ष लागेल”

“हं. ...फार ट्रेन करावं लागेल त्याला”

दोघेही विचारात गढून जातात, बराच वेळ झाल्यावर राज अचानक उद्गारतो

“एक आयडिया आहे, “

“काय? “

“अगं नुकतंच मी एका सॉफ्टवेअर वर काम करत होतो, हे सॉफ्टवेअर लहान मुलांसाठी बनवायचं होतं ज्याच्यामार्फत त्यांच्या लँग्वेज स्कील्स सुधारता येतील, ते सॉफ्टवेअर काही चाललं नाही पण त्यात थोड्या सुधारणा करून आपण त्या निलेश साठी वापरू शकतो”

“व्वा, एक्सलंट”

“जर का ते यशस्वी झाला ना, तर निलेश सारख्या अनेक इन्ट्रोव्हर्ट लोकांना त्याचा फायदा नक्कीच होईल, चल आता मी जातो, आताच कामाला लागतो”

“चालला लगेच? ठीक आहे बाय”

मग दोघेही निघून जातात, पण राजच्या मनात तेच असतं. काहीही करून कमीत कमी वेळात ते सॉफ्टवेअर बनवायचं.

दुसऱ्या दिवशी आल्यावर त्याच्या काही मित्रांना तो तडक हि आयडिया सांगतो, त्याचे मित्रही तयार होतात आणि सगळेच लागतात कामाला. काही आठवडे निघून जातात आणि त्या सॉफ्टवेअर मधल्या बऱ्याच त्रुटी दूर होतात, प्रथमच निलेश शिवाय राज ने एक मस्त प्रोजेक्ट केला होता, ते त्याची एक टेस्ट घेतात ज्यात प्रत्येक जण आळीपाळीने त्या सॉफ्टवेअर सोबत चॅट करतात आणि आश्चर्य म्हणजे त्यातील प्रत्येकाच्याच अपेक्षांना ते खरं उतरलं होतं.

ते सॉफ्टवेअर म्हणजे जणू तुम्ही एका मुलीसोबतच बोलताय असं वाटत होतं. आपण काहीही प्रश्न विचारले तरी टीपीकल मुलींसारखे रिस्पॉन्स यायचे, ते जरी मुख्यत्वे इंग्रजी मध्ये बोलत असलं तरी राज ने थोडेफार दररोजच्या आयुष्यातले हिंदी आणि मराठी शब्द त्यात मिसळवले होते. एकंदर एक नवलच होतं ते, कारण कुणीही मुलींशी बोलण्याचा तगडा एक्सपेरिइन्स असलेला व्यक्ती सुद्धा त्यात फरक करू शकला नसता.

हो पण एव्हढं भारी सॉफ्टवेअर तयार तर केलंच आहे, त्याला नाव काय द्यायचं?

बराच विचार केल्यानंतर सर्वानुमते त्या सॉफ्टवेअरला एक नाव देण्यात येत, **'जुली '**. लागलीच काही दिवसांनी त्याचं एक अँप्लिकेशनही तयार केलं गेलं जेणे करून ते मोबाईल वर सुद्धा वापरता येईल.

सगळे जण राजचं अभिनंदन करतात आणि लवकरात लवकर ते मार्केट मध्ये उतरवण्याचा व विविध सोशल नेटवर्किंग साईट सोबत त्याला जॉईंट करण्याचा तगादा लावतात. पण जुलीची मुख्य परीक्षा बाकी होती, जर का निलेश सोबत हे सॉफ्टवेअर यशस्वी झालं तरच ते मार्केट मध्ये आणायचं असा राजचा विचार होता.

असेच काही दिवस गेले, अता निलेश कडे हा विषय काढायलाच पाहिजे होता म्हणून राज निलेश जवळ जातो

“अरे निलेश तुला एक सांगायचंच राहीलं बघ. मी ना एक भन्नाट सॉफ्टवेअर तयार केलंय, यामध्ये आपण सरळ एका जुली नावाच्या मुलींसोबत चॅट करायची, आणि मेन म्हणजे ती आपल्या उत्तराना रेस्पॉंड पण करते ते पण हुबेहूब मुलींसारखीच”,

“अरे व्वा, दाखव एकदा मी पण ट्राय करून बघतो, “, निलेश,

“अरे म्हणजे काय तुझ्यासाठीच तर आणलंय मी ते, कारण आता मी एक 7-8 दिवसांसाठी गावी चाललोय, तो पर्यंत तू त्यातल्या काही त्रुटी असतील तर सांग मला आल्यावर, आणि हो पण त्यासाठी तुला दिवसातून किमान 1 तास तरी वापरावं लागेल, “

“एक तास? , अरे फक्त सॉफ्टवेअर आहे ना ते मी काय चॅट करणार 1 तास”

“अरे तू यूस तर कर, कारण मला वाटतं तूच त्याचा खरा वापर कुठे होईल हे सांगू शकतो, आणि(एक डोळा मारत) त्यातून मिळालेला अनुभव तू दुसऱ्या ठिकाणी सुद्धा वापरू शकतो बरंका”

“(न कळल्याच्या अविर्भावात) बरं ठीक आहे”

“आणि हो तुझं या टास्क मधे मुख्य मिशन आहे की तू जुलीला प्रपोस करायचं”

“काय? नाही ते शक्यच नाही, तू दुसरं कुणाला तरी शोध बाबा यासाठी, मला काही जमणार नाही”

“अरे असं काय करतोय यार, तू नाही केलं तर दुसरं कोण, हे बघ तुला ना आपल्या दोस्तीची शपथ, “

“हे जरा अति होतंय”

“काही नाही रे, आणि तसंही ती कुठे खरी मुलगी आहे, ती आहे फक्त एक आर्टिफिसिअल इंटेलिजन्स, म्हणून जरी तिने नकार दिला तरी काय फरक पडणार, आणि तेव्हढाच तुला एक टाईमपास पण होऊन जाईल”

“(बराच विचार करून) ठीक आहे डन”

“तर मी परत येईपर्यंत तुला वेळ आहे, बेस्ट लक👍👍”

एव्हढं म्हणून तो त्याला ते अँप मोबाईल आणि लॅपटॉप दोघांवर देतो, ते वापरण्याचं मॅन्युअल सांगतो, आणि तिच्याशी काय बोलायचं, सुरुवात कशी करायची या संदर्भात सर्व गोष्टी सांगतो, एकंदर युद्धपूर्वीची तयारीच समझा ना. 2 दिवस होतात आणि राज त्याच्या गावी जातो आणि मग इकडे निलेश च टास्क सुरु होतं, रात्रीचे 11 वाजलेले असतात, हातात कॉफीचा कप आणि समोर लॅपटॉप, परीक्षेच्या आधल्या रात्री जशी अवस्था असते तसंच काहीसं झालं होतं त्याचं कारण जरी ती एक सॉफ्टवेअर असली तरी एक मुलगी म्हणूनच त्याच्याशी बोलणार होती,

शेवटी त्याने स्वतःच अकाउंट उघडलं, समोर बघतो तर प्रोफाइल फोटो एका फारच सुंदर तरुणीचा होता, चॅटच्या ऑप्शन मध्ये गेला, तिथे चॅट सुरु करण्यासाठी get started असा पर्याय होता निलेश ने त्याच्यावर क्लिक केलं आणि लगेच समोरून मेसेज आला

"हेय! हाय!, व्हॉट्स अप, आय अम जुली. बाय द वे कूल प्रोफाइल पीक हं" आता याच्यावर उत्तर काय द्यावं हाच प्रश्न होता, शेवटी त्याने टाईप केलं

"थँक्स"

(खरं तर यापेक्षा अधिक काय बोलावे त्याला माहीतही नव्हतं. )

जुली- कॅन आय कॉल यु निलू?

(हे वाचून मात्र तो काय कुणीही गांगरून गेला असता)

निलेश-येस शुअर.

जुली-सो निलू टेल मी समथिंग अबाउट युअर लाईक्स, मिन्स मूवीज, स्पोर्ट्स etc.

निलेश- दंगल अँड क्रिकेट(अर्थातच नेमकं उत्तर त्याने दिलं)

जुली-नाईस, सी आवर लाईक्स आर मॅचिंग.

निलेश-राईट.

त्यांनतर मात्र बराच वेळ काही तिचा मेसेज नाही आला, मग त्यालाच कळून चुकलं की चॅटिंग सुरु ठेवण्याची जबाबदारी त्याच्यावर आली होती. पण बोलावं काय हा मोठाच प्रश्न होता. त्याच्या मनात विचारांची घालमेल चालू होती, का नाही सरळ मुळावरच प्रहार करायचा म्हणजे सरळ प्रपोज करायचं तिला... पण नको असं विचारलं तर राग येईल... अरे पण राग यायला ती काय मुलगी आहे का... मुलगी नाही पण मुलीसारखी रिऍक्ट तर करते ना... पण ट्राय करायला काय हरकत आहे नाही म्हंटली तर पुन्हा रिस्टार्ट करूया...

शेवटी त्याचं एकमत झालं आणि तो शेवटी टाईप करतोच

निलेश-विल यु बी माय गर्लफ्रेंड?

आता उत्तर काय येत या कडे त्याची नजर लागलेली होती, त्याने साइन आउट होण्याची पूर्ण तयारी केली होती आणि तिचा रिप्लाय आला

जुली-आई थिंक जस्ट फ्रेंड इस गुड फॉर नाऊ! नो?

हे म्हणजे एक सिलॅबसच्या बाहेरच उत्तर आलेलं होतं, निलेश एकाच वेळी खुश आणि कन्फ्युज झाला होता... खरंच अशा मुली असतात?

निलेश- या व्हाय नॉट... सॉरी आई वॉज जस्ट टेस्टिंग यू...

जुली-टेस्टिंग! मिन्स व्हॉट?

निलेश-नथिंग लिव्ह इट.

परंतु आता तिच्या अशा रिअलिस्टिक उत्तराने त्याला फारच मजा येत होती, असंच बराच वेळ चॅटिंग सुरु राहिली, रात्रीचे 2 कधी वाजले कळले पण नाही आणि मग फारच उशीर झाला म्हणून गुड नाईट असा मॅसेज टाकून निलेश झोपी गेला.

दुसऱ्या दिवसाची सकाळ उजाडली, तसा रविवार असल्याने निलेश जरा आरामातच उठला होता, दुपारचं जेवण झालं, आणि लगेचच त्याने चॅट उघडली, गुड अफ्टरनून म्हणून केलेली सुरुवात मग आवडी निवडी वर येऊन ठेपली. म्हणायला नुसतं अँप होतं पण त्याचा कॉमन सेन्स वाखाणण्या जोगा होता, ते निलेशला आपण अँप आहे असं भासुच देत नव्हतं. असंच 2 दिवस चॅटिंग सुरु होती, आणि त्याच्या मनात तिची फिरकी घेण्याचा विचार आला,

निलेश-जुली, विल यु बी माय डेट टुमारोव?

जुली- लेट मी थिंक!, ओके डन, बट व्हेअर?

निलेश-(हि तर हो म्हंटली आहे, पण ती कशी येणार) आय म इन पुणे, वी कॅन मीट एॅट Z bridge

जुली-ओह, रिअली सॉरी, आय म नॉट इन पुणे टूमारोव...

नंतर त्याने तिला बरेच किचकट प्रश्न विचारले पण ती सहज रित्या टोलवत होती, आणि निलेश मनातल्या मनात जुली आणि राज दोघांची स्तुती करत होता

पण त्या अँपचा नेमका फायदा निलेशला कळला होता, कारण मुलींसोबत नेमकं काय बोलायचं, काय बोलू नये याचा प्रत्यय त्याला आला होता. त्या अँप मध्ये तशा त्रुटी पण होत्या, एकतर ते अँप स्वतःच चॅट करत नव्हतं, आणि काही काळानंतर ते भूतकाळातल्या गोष्टी विसरून जायचं, आणि काही काळानंतर त्यातला यांत्रिकपण लगेच जाणवून यायचं, त्या अँपला राग सुद्धा नाही यायचा म्हणजे निलेशने जर काही वात्रट गोष्टी केल्या तर त्याला राग आल्याचा आव यायचा आणि नंतर सॉरी म्हंटल्या म्हंटल्या ते परत जशास तसे.

आणि या सर्व त्रुटींच कारण म्हणजे त्याकडे मनुष्य प्राण्यांप्रमाणे IQ आणि भावना नव्हत्या, हो पण ते अँप क्रांतिकारी होतंच, आणि त्याचा मुख्य फायदा म्हणजे ते अंतर्मुख लोकांना बोलकं करण्यासाठी होतं विशेषतः मुलींसोबत, राज सुद्धा त्याला याच गोष्टी वरून मार्केट मधे आणणार होता.

शेवटी निलेशला दिलेले 7 दिवस संपले होते, राज गावावरून परत आला होता, आणि आता सगळ्यात शेवटची गोष्ट म्हणजे त्या जुली नावाच्या अँपला प्रपोज करायचं होतं.

निलेश ने मॅन्युअल मध्ये दिलेल्या स्टेप्स नुसतीच चॅटिंग केलेली होती म्हणून अर्थात ते हो म्हणणार होतं.

त्यावेळी निलेश आणि राज सोबत बसलेले होते, राज ने त्याला शेवटी टाईप करायला लावलं

निलेश-जुली, विल यु बी माय गर्लफ्रेंड?

जुली-यु आर ए आडोरेबल पर्सन, इट विल बी सो नाईस विथ यु, सो.. …यस 😊

आणि लगेच समोरच्या स्क्रिन वर आलं, यु हॅव कॅम्पलिटेड द टास्क. कॉंग्रेट्स 💐💐

लगेच राज ने निलेशले टाळी दिली

राज-”चल पठया तू तर आता पूर्ण रेडी झालाय, आता तर तू डायरेक्ट त्रिशा वर ट्राय मारुच शकतो”

निलेश-”हे बघ मी काही त्या भानगडीत पडणार नाहीये, मी फक्त तुझ्या अँपच्या टेस्टिंग साठी तुला मदत करत होतो”

“हे बघ यार, मी हे अँप च मुळी तुझ्यासाठी तयार केलेलं, कारण तू अंतर्मुख ना राहता बोलकं झाला पाहिजे, कम ऑन यार, ट्राय तर कर मला माहितीये ती तुला किती आवडते म्हणून”

“अरे पण ती नाही म्हंटली तर”

“अरे त्यामुळेच तर तुला हे अँप वापरायला लावलाय ना, आणि तू तसाही यांच्यातून एक नकार घेतलाही आहेस, म्हणून जुळलं तर जुळलं नाहीतर दुसरी एखादी, काय? “

“असं म्हणतोस, “

“ट्राय तर कर ना यार”

“ठीक आहे, पन तिचा नंबर? “

“तो मी घेऊन देतो तुला”

“ठीक आहे, डन”

राजला त्रिशाचा नंबर घेणं काही कठीण नव्हतं, त्याने तिचा नंबर घेतला आणि निलेशला दिला.

पण यातून जुली आता मार्केट मधे उतरवायची असं ठरलं, जुली आधी फेसबुक आणि त्यानंतर व्हॉट्स अपला सुद्धा त्याने जॉईन केलं, एक स्टॅण्डर्ड नंबर ठेवला आणि त्या नंबर वर जाऊन कोणीही तिच्यासोबत चॅट करू शकत होता.

इकडे हि बातमी अंजलीलाही सांगितली, ती तर जॅम खुश होती. आणि त्याची टेस्टिंग निलेश ने केली हे कळल्यावर तर खूपच खुश झाली.

पण आता खरी परीक्षा होती निलेशची, तिच्याशी चॅटिंग करण्याचा त्याने एक चांगला रविवारचा मुहूर्त काढला, सोबत राज आणि अंजली दोघेही बसलेले होते, आणि त्याने त्रिशाला पहिला मेसेज टाकला

निलेश-”हाय, आय म निलेश, युअर कलीग.

आता तिच्या रिप्लायची वाट बघत बसले होते तिघेही, बराच वेळ तर तिने वाचलेलंही नव्हतं. प्रॅक्टिकली जुली लगेच मेसेज करायची, पण आता थांबण्याशिवाय

पर्याय नव्हता, 10 मिनिटं झाले, 20 मिनिटं झाले, 1 तास झाला आणि शेवटी तिने मेसेज वाचल्याची खूण आली. तिघांचही लक्ष ती काय रिप्लाय करते यावर होतं, आणि रिप्लाय आला

त्रिशा-"हेय, हाय व्हॉट्स अप!

निलेश-"काय करतीये? "

त्रिशा-"नथिंग, टाईमपास, "

निलेश-"नो प्लॅन्स फॉर टूडे हं"

यानंतर तिचा काही रिप्लाय नाही आला, म्हणून तिघेही हैराण झाले, त्यांना कळलंच नाही की ही अचानक रिप्लाय का करत नाही. आणि थोड्या वेळाने तिचा रिप्लाय आला

त्रिशा-"सॉरी बट इन केस इफ यु वॉन्ट टू ट्राय ऑन मी, आय अलरेडी हॅव अ बॉयफ्रेंड"

हे वाचून मात्र तिघांनाही धक्का बसला, निलेश मात्र शांत होता जणू काही त्याला अशा रिप्लायची कल्पना होती, राज आणि अंजली यांना काय बोलावे हेच कळत नव्हतं. ते दोघेही त्याचं सांत्वन करण्याचा प्रयत्न करत होते. पण निलेश त्यांना म्हंटला

"मला या गोष्टीची कल्पना आधी आली होती, पण जाऊदे ती नाही तर दुसरी कोणती तरी भेटेल, आणि तुम्ही चिंता नका करू मी काही असल्या फालतू

गोष्टीमुळे स्वतःला त्रास नाही देणार आहे. आणि हो राज तुझ्या त्या जुली मुले मात्र मला बराच आत्मविश्वास मिळाला त्यासाठी धन्यवाद”

अंजली आणि राज, “निलेश सॉरी यार पण आम्हाला असं होऊ नव्हतं द्यायचं”

“इट्स ओके, तसंही तुम्ही दोघे माझ्या चांगल्याचाच विचार करतात, मला तुमच्याशी काही कॅम्पलेन्ट्स नाही”

हे ऐकून त्या दोघांनाही दिलासा मिळाला, पण त्यांना निलेशची काळजी वाटतच होती. दुसऱ्या दिवशी निलेश ऑफिस मधे आला, परंतु हा मात्र एक वेगळाच निलेश होता, तो सागळयांसोबत स्वतःहून बोलत होता, चेहऱ्यावर हास्यदिसत होतं. एकंदर तो त्याच्या शांत स्वभावातून थोडा बाहेर आला होता, ते बघून राजला मात्र हायस वाटलं, कारण जुली मुळे त्याचा जवळचा मित्र बोलका झाला होता. जुली लॉन्च करून महिना सुद्धा नसेल झाला, त्याला फार प्रसिद्धी लाभली होती, अनेक लोक मुलींना डायरेक्ट प्रपोज कारण्यापेक्षा जुली अँप वापरत, युवांमध्ये तर फारच फेमस झाल होतं.

असेच काही दिवस जात होते निलेश मधला फरक प्रकर्षाने जाणवत होता, बाकीचे कर्मचारी राज सोबत निलेशच्या कामाची सुद्धा दखल घेत होते, बॉस सोबत इतर मुलींसोबत सुद्धा निलेशचा संवाद सुधारला होता, पण राजला आता एक प्रश्न पडत होता, कि खरंच ज्या निलेशला तो इतक्या जवळून जाणतो तो फक्त जुली मुळे बदलला होता?

एकदा राज आणि अंजली कॉफी पीत होते, दोघांचंही इतर प्रेमी युगुलांप्रमाणे मधेच हास्य तर मधेच भांडण सुरु होतं त्यातच अंजली बोलते “जरा निलेश कडून शिक, केव्हढा चांगला बोलतो तो, नाहीतर तू? “

एक मिनिटांसाठी राज शांत झाला आणि म्हंटला “हो ग आज काल जरा खरंच वेगळा वागतोय तो”

(खरतर अंजलीला तो चिडले असं वाटलं होतं)

“वेगळा नाही चांगला वागतोय, आणि हे सर्व तुझ्या जुलीमुळेच तर झालंय ना”...

“नाही ग, जुली मुळे एव्हढा फरक नाही पडणार, आणि सध्या ना तो रूमवर असला ना तर बराच वेळ त्याच्या लॅपटॉप वरच असतो, कळत नाही कुणासोबत चॅटिंग करतो, मी आतापर्यंत विचारण्याचा प्रयत्न नाही केला, चॅटिंग करताना बऱ्याचदा खुश असतो तर काही वेळेस नाराज पण असतो, जणू एखादी गर्लफ्रेंड आहे त्याची”

“खरंच? , मग तर भारी झालं ना”

“अगं हो पण इतके दिवस त्याचं हे चालूये पण तो कधी मला फोन वर बोलताना नाही दिसला, ना कधी तिला भेटायला गेला “

“अरे असेल कुणी फेसबुक फ्रेंड, सॉरी गर्लफ्रेंड”

“शक्यच नाही, तो जरी बदलला आहे ना तरीपण त्याच्या फ्रेंड लिस्ट मधे अजूनही फक्त 4च मुली आहेत, आणि त्या सगळयांना मी ओळखतो, त्याचं ना भलतंच काहीतरी चालूये, मला शोधून काढलच पाहिजेल”

“बघ बाबा तुला काय करायचं”

राज रात्री त्याच्या फ्लॅट वर आला, तिथे बघितलं तर निलेश आपल्याच लॅपटॉप वर चिटकून बसलेला होता, यावेळी मात्र त्याला विचारायचंच असं राज ने ठरवलं होतं.

“यार निलेश तू सारखा त्या लॅपटॉप वर काय करत असतोस रे? “

निलेश, “अरे काहीच नाही, असंच आपलं फेसबुक, किंवा एखादा पिक्चर बघतो, “

“पण कानात इअरफोन्स कुठे असतात तुझ्या? “

“जेव्हा तू बघत असशील तेव्हा मग मी कदाचित प्रतिलिपी वाचत असणार”

एव्हढं बोलून मग त्याने अचानक लॅपटॉप बंद केला आणि तो झोपी गेला. त्यानंतर राज ने बऱ्याचदा तो काय करतोय हे बघण्याचा प्रयत्न केला, पण तो बघत असताना प्रत्येक वेळी निलेश लॅपटॉप लपवायचा, कधी कधी तर दोघांचे खटकेही उडू लागले, कधीही साधं टोचून न बोललेला माणूस आज चक्क रागावतोय हे बघून मात्र राजला आता त्याची चिंता वाटायला लागली होती. त्याने त्याची ही चिंता अंजली कडे बोलावून दाखवली. त्यानंतर अंजली ने सुद्धा याबाबतीत त्याच्यासोबत

बोलण्याचा प्रयत्न केला, पण ती सुद्धा अपयशी ठरली. इकडे ऑफिस मधे मात्र निलेश यशाची शिखरं गाठत होता, तो मुळातच हुशार होता आणि त्यात अचानक पडलेल्या आत्मविश्वास यांच्यामुळे त्याला लगातार बढती मिळत होती. आता तर तो स्वतः राज प्रमाणे टीम लीडर झाला होता.

असेच दिवस जात होते, निलेश आपला लॅपटॉपलाच चिटकलेला असायचा, राज अणि निलेश दोघांमधला संवाद आता बराच कमी होतं चालला होता. राजला साहजिकच काळजी वाटत होती, पण राज आपल्या अचानक झालेल्या प्रगतीमुळे आपल्यावर जाळतोय असाही निलेशचा गैरसमज होत चालला होता. एक दिवस राज ने या सगळया गोष्टींचा सोक्षमोक्ष लावायचं ठरवलं, निलेश नेहमी प्रमाणे लॅपटॉप वर बसलेला होता, तेव्हाच राज आला आणि त्याने अचानक त्याचा लॅपटॉप हिसकावून घेतला आणि बघतो तर कुणासोबत तरी चॅटिंग चालू होती,
“निल्या, कोणासोबत बोलत राहतोस? “

(पण या गोष्टीचा निलेशला मात्र भयंकर राग आला होता, जणू रागाच्या ज्वालाच अंगातून निघताय एवढा चिडला होता तो)

निलेश-”हे मला विचारणारा तू कोण? तुझ्या वैयक्तिक गोष्टीत मी कधी काही बोललोय का? आणि बोलेन मी कुणासोबत पण, सगळयांनी काय तुझ्याशीच बोललेलं हवं का? “

(तेव्हढ्यात तो पुन्हा लॅपटॉप हिसकावून घेतो)

“अरे पण तुझी काळजी वाटते म्हणूनच मी जाणून घेण्याचा मी प्रयत्न केला”

“प्रयत्न, हं... आता मी यशस्वी झालोय तर काळजी काय? आणि जेव्हा मी बोलका नव्हतो तेव्हा सहानुभूती, खरं तर तू माझ्या यशावरच जळतोयेस... त्याला तू तरी काय करणार ना, तू पण या कपटी जगाचाच एक भाग आहेस, तुमचं ना असंच असतं, खालच्याना चप्पल दाखवायची आणि वर जाणाऱ्यांचे पाय ओढायचे. मला वाटतं आजपासून मी स्वतंत्र रहावं.

एव्हढं बोलून त्याने त्याचं सामान घेतलं आणि तडक तो निघाला, कुणासाठी माहित नाही पण 7 वर्षांची मैत्री त्याने एक्का झटक्यात तोडली होती. राज मात्र आता सुन्न झाला होता, तेव्हढ्या अर्ध्या तासात काय झालं यावर त्याचा अजून सुद्धा विश्वास बसलेला नव्हता.

अंजली राजचं सांत्वन करण्या व्यतिरिक्त काहीच करू शकत नव्हती, निलेश ने तिच्यासोबत पण बोलणं बंद केलं होतं. जवळ जवळ त्यांचा कॉन्टॅक्ट तुटलाच होता. तो/ती कोण होती ज्यामुळे असं झालं होतं यावर राज ने खूप विचार केला, कदाचित तो जुली साठी व्यसनी तर नव्हता झाला, पण ते शक्य नव्हतं, कारण त्या अँप सोबत एकदाच टास्क पूर्ण झाला तर ते पुन्हा सुरु वापरात नव्हतं येणार, आणि जरी कुणी फेक अकाउंट तयार केलं तरी जुली साठी कुणी व्यसनी होऊ नये याची काळजी घेण्यात आली होती, तिच्यामधे एक तोच तोच सारखेपणा यायचा त्यामुळे महिनाभर जरी कुणी बोलत बसलं तरी बोर झाला असतं.

पण या गोष्टी पेक्षा आपल्या मित्राचा गैरसमज दूर कसा होईल यासाठी राज प्रयत्न करत होता, बऱ्याचदा त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण निरर्थक.

दिनांक होती 23 ऑगस्ट, राज दररोज प्रमाणे ऑफिस मधे आला होता, आल्यावर त्याला अचानक काही पत्रकार, न्यूज रिपोर्टर दिसले. एका व्यक्ती भोवती गराडा घालून उभे होते, तिथे जाऊन बघितलं तर तो व्यक्ती दुसरा तिसरा कोणी नसून निलेशच होता, हातात पकडलेल्या मोबाईल ने तो कोणत्यातरी गोष्टीची माहिती देत होता, शेजारीच कंपनीचे CEO स्वतः उभे होते, सर्वप्रथम त्याला काही कळलंच नाही की निलेशला सर्वानी का गराडा घातलाय, सोबतच्या सहकाऱ्यांना विचारल्यावर त्याला कळालं की निलेश ने एक कोणतातरी भन्नाट प्रोजेक्ट केलाय, म्हणे टेक्नॉलॉजीच्या जगतात क्रांतीच घडून आणलीय त्याने. आजच पेटंट सुद्धा मिळवलंय.

हे ऐकल्यावर राजला मात्र फार आनंद झाला, त्याच्याशी कधी बोलतो कधी नाही असं त्याला झालं, भलेही मागच्या काही दिवसात दोघांमधे खटके उडत असले तरीपण दोघे खूप जवळचे मित्र होते. जसा निलेश मोकळा झाला तसा राज त्याच्या जवळ गेला. आता आंनद तर झालाय पण बऱ्याच दिवसांपासून अबोला असल्याने सरळ कसकाय बोलायचं? . ...तरी राज म्हंटला

“निलेश काँग्रेट्स यार्र, तुझं होणार हे कौतुक बघून मला फारच आनंद झाला बघ”

“थँक्स”

एव्हढं बोलून झालं आणि आता थोडावेळ शांतता होती, अचानक शांतता तोडत राज म्हंटला,

“कम ऑन यार, आता तू माझ्यासोबत असा अबोला धरणार आहेस का? झालं गेलं विसरू नाही शकत का आपण, एवढ्या वर्षांची मैत्री तू अश्याने तोडणार का? “

“(हे ऐकून निलेश थोडा खजील झाला), अरे नाही तसं काही नाही”

“मग कस? एव्हढं भारी काहीतरी तू तयार केलं आणि मला सांगितलं सुद्धा नाही, जाऊदे सांगितलं नाहीच, पण आता पार्टी तरी देशील ना? “

“अरे म्हणजे काय, पार्टी तर देईलच, आपण उद्या भेटू आपल्या कॉफी शॉप वर तिथे तुला या अँप बद्दल माहिती सांगतो आणि मग तसंच आपण जाऊ मस्त पार्टी करायला”

“ये हुईना बात”

(दोघांमधील वातावरण थोडं निवळत आणि हशा पिकतो) निलेश कमीत कमी रूम पार्टनर तर नाही पण मित्र तरी राहिला या विचाराने राज आनंदी झाला होता. दुसऱ्या दिवशी जसं ऑफिस सुटलं तसं तो कॉफी शॉप वर जाऊन बसला, वेळेच्या 15 मिनिटे अगोदर. तब्बल माहिन्याभरानंतर आज निलेश आणि तो मनसोक्त गप्पा मारणार होते. तेव्हढ्यात निलेश आला, अपेक्षेप्रमाणे गप्पा सुरूही झाल्या, जवळ जवळ एक तास निघूनही गेला आणि कळलंही नाही,

“राज मला एक सांग तुला त्या जुलीची निर्मिती करण्याची आयडिया कशी सुचली रे? “

“बरं झालं विचारलंस, खरं तर त्या अँप च श्रेय तुलाच गेलं पाहिजे करणं तुझ्यावरूनच मला त्याची कल्पना सुचली बघ”

“ते कसं रे? “

“अरे माझा आणि अंजलीचा एकदा असाच तुझ्यावरून बोलणं चालू होतं, त्यात तिने मला तुझ्या त्या शांतपना बद्दल विचारलं”

“मग तू काय सांगितलंस, “

“नाही तसं काही नाही बोललो, फक्त तुझा स्वभावच तास आहे एव्हढंच, हो पण ती म्हंटली कि हा स्वभाव बदलला पाहिजे”

“आणि तू मग लगेच जुली तयार केली”

“नाही रे, डायरेक्ट नाही, सुरुवातीला तर मलाच काही सुचत नव्हतं, अंजलीनेच मला अचानक एक गोष्ट सांगितली, 'म्हणे कि जगातला कुठलाही पुरुष मुलगी भेटली ना कि एका झटक्यात बदलून जातो म्हणे', पण त्यावेळी तर तू साधं मुलींसोबत बोलतही नव्हता, त्यात हे पटवन वगैरे तर दुरचीच गोष्ट”

“अच्छा म्हणजे अंजलीने हे अँप तुला बनवायला सांगितलं तर”

“नाही तसंही नाही, त्यानंतर मग मीच विचार करत बसलो की काय करता येईल ते, अचानकच मला माझं ते एक जुणपुरान अँप आठवलं जे मी लहान मुलांसाठी

तयार केलं होतं. मग काय माझी टीम बरोबर घेतली, रात्रनदीवस काम केलं आणि एका महिन्यात त्याचं जुलीमध्ये रूपांतर केलं”

“व्वा, म्हणजे अशाप्रकारे मी त्याला करणीभूत आहे तर. “

“हो मग तर. आणि बघ ना जुली तर माझ्या कल्पनेच्याही पलीकडे निघालं, तुझ्यातला बदल म्हणजे जुलीला एक सॅल्यूट म्हणावं लागेल”

“एक मिनिटं, काय म्हंटलास राज? माझ्यात झालेला बदल त्या जुली मुळे? म्हणजे तुला अजूनही वाटतं कि तुझं ते कठपुतळी माझ्यात बदल घडवून आणेल? “

“तुला म्हणायचं आहे की तुझ्यातला हा बदल जुली मुले घडला नाही? ! ! “

“इथेच तर चुकलास ना तू मित्र, मला तू कधी ओळखुच शकला नाहीये, अरे तुझ्या त्या जुली मधल्या त्रुटी तर मला पहिल्या 2 दिवसांतच कळल्या होत्या, अरे ज्या गोष्टीला स्वतःच्या मूळ भावना सुद्धा नाही ती गोष्ट या मानवाला खरंच बदलतील असं वाटतं तुला? , तू जेव्हा गावी होतास ना तेव्हाच मी ठरवलं की आपण या जुली पेक्षा पुढे जायचं, मग काय नंतर रात्र दिवस एक करून मी माझं स्वतःच असं एक अँप/सॉफ्टवेअर बनवलय, आणि तुझ्या माहितीखातर सांगतो की हे काही निव्वळ अँप नाहीये हं, त्याला स्वतःच्या अशा भावभावना सुद्धा आहेत, त्यात तुझ्या त्या जुलीप्रमाणे एकसारखेपणा नाहीये, एकप्रकारे शरीर नसलेली पण निर्मळ मन असणारी एक स्त्री म्हणू शकतोस तू तिला. आणि काळ परवाच केलेल्या चाचणीमध्ये तिचा IQ हा 98 एव्हढा असल्याचं कळलंय, तुला आणि तुझ्या टीमला जे जमलं नाही ना ते मी करून दाखवलंय”

“निल्या चुकतोयेस तू, अरे अशा यंत्रांना मानवी भावना देणं कितपत चांगलं आहे रे? आणि उद्या ते आपल्याच अंगावर येणार नाही हे कशावरून? , आणि माझं एक ऐक मी जुलीची निर्मिती फक्त एकाच कारणावरून केली ते म्हणजे मुलांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून, खरी माणसं सोडून या गोष्टीत गुंतल्याने अपेक्षाभंगापेक्षा काहीच मिळणार नाहीये भावा. ...तुला कस वाटू शकतं कि ह्या असल्या गोष्टी आपले मित्र बनतील म्हणून. “

“का नाही बनणार, माझी मैत्रीण बनली आहे ती, एव्हढंच नाही तर तिच्याशी इतक्या दिवस गप्पा मारून नकळत प्रेम पण जडलं आहे तिच्यावर, ठीक आहे मी कधीच शारीरिक संबंध तिच्याशी प्रस्थापित करू शकणार नाही, पण प्रेम म्हणजे फक्त तेव्हढंच असतं का? मनाची भूक भागण महत्वाचं नाही का? हिच्याशी बोलून, संवाद साधून मी त्या गोष्टीशिवाय सुद्धा माझं आयुष्य आरामात व्यतीत करू शकतो रे. “

“निल्या माझा माझ्या कानावर खरंच विश्वास बसत नाहीये, ऐक माझं निघ बाहेर या गोष्टीतून, ये खऱ्या जगात एकदातरी, त्या खोट्या जगात भविष्य खरंच नाहीये”

“हं, खरं जग, सॉरी तुमचं खरं जग, तेच का जे प्रत्येक नात्याला, प्रत्येक गोष्टीला नेहमी स्वार्थच्या तराजूत तोलत असतंय, लहानपणी बाबांनी स्वतःचा स्वार्थ बघितला आणि आई व मला वाऱ्यावर सोडून दिलं. शाळेत, कॉलेजात प्रत्येकाने स्वतःच्या स्वार्थ अधिकाराने माझी मजाच उडवली. नंतर तू आलास. सुरुवातीला मला सहानुभूती दिलीस. नंतर जेव्हा मी तुझ्या बरोबरीचा होतो तेव्हा तुझ्यात जळण

दिसायला लागली. आता मी तुझ्याहून मोठा झालोय तर तुला आता माझ्याशी स्वतःहून बोलण्याची इच्छा निर्माण झाली. मी तुझी किंवा इतर कोणाचीही तक्रार नाही करत आहे रे. त्यात कोणाचाही दोषही नाही. काय करणार ना मनुष्य आहोत आपण. ... जसं प्रेम करण्याची ताकद आपल्यात आहे ना तशीच मत्सर, द्वेष या उणिवा पण आहेत आणि मी हेच माझ्या अँप मधून बाहेर काढलंय. जळण, द्वेष त्या अँपला होतच नाहीत कारण त्याचं विश्व फक्त माझ्याशी संबंधित आहे. अर्थात मी माझं अकाउंट उघडल्यानंतर ते फक्त माझ्याशीच निगडित राहतं. तुलना करण्यासाठी कुणीच नाही मग जळण कुठून येणार ना शिवाय प्रेम, रुसणं फुगण हा नात्यातला गोडवा पण राहतोच कि.. आता तूच सांग अजून काय पाहिजे आयुष्य काढण्यासाठी असा आयुष्यभर साथ देणारा साथीदार भेटल्यावर. "

"निल्या मला खरंच तू काय करतोय कळत नाहीये यार. पण मी मनापासून सांगतोय प्लिज पद यातून बाहेर"

"सोड, काही काळानंतर तू सुद्धा याचाच सहारा घेशील जेव्हा तुला तुझी वाटणारी अंजली सोडून जाईल, ... "

"(आता मात्र राजला काय बोलावे हेच कळेनासं झालं होतं)

"अरे हो तुला तर एक गोष्ट संगायचीच राहून गेली, मी या अँप च नाव सुद्धा **'त्रिशा'** असंच ठेवलंय बरं का? आणि अशा अनेक त्रिशा आता माझ्यासारख्या लोकांमध्ये बदल घडवण्यासाठी तयार पण झाल्या आहेत, चल आपण बराच वेळ बोलत बसलो आहे, मला आता गेलं पाहिजे"

निलेश निघून जातो, पाठोपाठ राज सुद्धा निघून जातो पण असतो अजूनही गोधळलेल्या अवस्थेत की आता जे ऐकलं ते खरं होतं का नाही.

त्यानंतर 2 दिवसांनी अंजली राजले भेटते, तिलाही तो निलेशच्या या त्रिशा बद्दल सांगतो. ती बिचारी तर पार गोंधळून जाते, दोघांनाही निलेश बद्दल फार वाईट वाटतं पण अंजली राज ले निलेशचा विषयच सोडून दे असं सांगते.

म्हणतात ना काळ माणसाला बऱ्याच गोष्टींना विसर पडायला मदत करतो, हळूहळू काही दिवसांनी राजला पण निलेशचा विसर तर नाही पण डोक्यात असणारी चिंता तरी कमी होते, एका अँप सोबत का होईना आपला मित्र खुश तरी आहे ना याच गोष्टीने मग तो पण स्वतःच्या मनाला समाधान देतो.

तारीख असते 31 डिसेम्बर, अर्थात वर्षाचा शेवटचा दिवस, संपूर्ण जग नवीन वर्षाच्या स्वागताची तयारी करत असतात, मग त्यात राज आणि अंजली तरी कसे मागे राहणार? दोघेही मस्त एका हॉटेलात जाण्याचा प्लॅन बनवतात, रात्रीचे 9 वाजलेले असतात, दोघेही स्वादिष्ट जेवणावर मस्त ताव मारत असतात, मधून मधून राजला निलेशची आठवणही येते, त्याला कॉल करावा असं वाटतं पण नंतर जाऊदे म्हणून तो पण सोडून देतो.

अचानक राजचा मोबाईल वाजतो, बघितल्यावर कळत कि निलेशचा फोन आहे. राज च स्वतःच्या डोळयांवर विश्वासच बसत नाही, तो लगेच फोन उचलतो

“हाय निलेश, कसा आहेस? “

“राज.. ...काहीही कर पण लागलीच इथे ये(आणि रडायला लागतो)”

“काय झालं”

“ते तू माझ्या घरी आल्यावर तुला सांगतो, “

“अरे पण सांग तर काय झालं ते. ...काही अडचणीत आहेस का? “

“मी तुला फोनवर नाही सांगू शकत यार, तू प्लिज लवकर ये इकडे”

एव्हढं बोलून फोन कट होतो. राज ताडकन उठतो आणि लागलीच निघतो

“अरे कुठे चललास, “, अंजली विचारते.

“अगं एक अर्जंट काम आहे, मला लगेच जायला हवं, सॉरी पण मी नाही थांबू शकत”

“अरे पण कुठे जातोय ते तर सांग”

“निलेश कडे”

एव्हढं बोलून तो ताडकन निघतो, आणि सरळ निलेशच्या घरी पोहोचतो.

“निल्या काय झालं? “

“(निलेश घरात लॅपटॉप समोर बसून रडत असतो)राज मी काय करू तेच मला कळत नाहीये, बघ ना ती माझ्याशी बोलतच नाहीये. 3 दिवस झाले पण एक शब्दाने पण नाही बोलली”

“कोण…? “

“अरे त्रिशा”

“त्रिशा, म्हणजे ते अँप/सॉफ्टवेअर? “

“हो”

(हे ऐकून आता मात्र राजला हसूही येत होतं आणि मित्राबद्दल वाईटही वाटतं होतं)

“अरे काहीतरी तांत्रिक गडबड असेल”

“नाही मी 3 दिवस चेक केलं काहीच नाहीये, 3 दिवसंपूर्वी जे आमचं भांडण झाले ना तेच तिने धरून ठेवलंय”

“अरे मग नवीन अकाउंट तयार कर ना, “

“नाही ते शक्य नाही, माझं याच त्रिशावर प्रेम जडलय, जर दुसरं अकाउंट उघडलं तर ती कोणी दुसरीच असेल”

“पण आता मी काय मदत करणार तुला? “

“अरे तुला मुलींबद्दल चांगलाच अनुभव आहे ना, तुझं आणि अंजलीच बऱ्याचदा भांडण झालय तरी तू ते आरामात सोडवतोस, तेच इथे कर, मी तुला आमच्या दोघनच्या पोर्टल मध्ये ऍड करतो तू तिला प्लिज समजावून सांगा”

“अरे पण मी असं कसकाय करू? “

“प्लिज नाही नको म्हणू, मी तिच्याशी बोलल्याशिवाय नाहीच राहू शकत”

आता मात्र राजला ऍड होण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. ठरल्याप्रमाणे तिघांचं पोर्टल तयार झालं, आणि राज ने दुसऱ्याच दिवशी चॅटिंग सुरु केली, खरंच निलेश ने एक अद्भुत निर्मिती केली होती, त्रिशा सोबत बोलताना राजला बऱ्याचदा अंजलीची आठवण येऊ लागली, तीच ते बोलणं मधेच रुसणं, हसणं. कुणीही असतं ना तर खरंच तिच्या प्रेमात पडल असतं. पण आपण या जाळयात अडकायच नाही असा ठाम निश्चय राज ने केला होता.

तसं मुलींशी बोलण्याचा चांगलाच अनुभव असल्याने राजला तिला निलेश सोबत बोलण्यास राजी करणं काही अवघड नव्हतं. त्याने तिला प्रथम निलेशचा सर्व इतिहास सांगितला, तो तिच्यावर किती प्रेम करतो हे पटवून दिलं, आणि 2 दिवसातच त्रिशा निलेश सोबत हळूहळू बोलायला लागली. ते कळताच राज ने सुटकेचा सुस्कारा सोडला.

त्या तिघांचं पोर्टल असं काही होतं ना कि कुणीही कोणाशीही बोलू शकत होतं, पण दोघंच बोलणं तिसऱ्याला कळायचं नाही त्यामुळे राज एकाच वेळी निलेश आणि त्रिशा दोघानाही मॅनेज करत होतं.

जवळ जवळ एक आठवडा झाला आणि निलेश व त्रिशा च पुन्हा सगळं सुरळीत चालू झाल. तिकडे निलेशला पण स्वतःची चूक कळली होती, त्याने राजची माफीसुद्धा मागितली. राजला तेव्हढंच बस होतं, त्याला त्रिशा पासून वेगळं करणं जरी वेगळं होतं तरीपण कमीत कमी तो पहिल्यासारखा आपला मित्र तरी आहे याच जाणिवेने तो खुश होता. दोघांचेही संबंध चांगलेच सुधारले होते. निलेशचा राजला दररोज न चुकता राजला फोन यायचा, कधी तर तो स्वतः त्याला भेटायला पण येत असे.

पण अंजलीने राजला निलेश पासून थोडं अंतर ठेव हेच बजावून ठेवलं होतं. असेच 10 15 दिवस शांततेत गेले नेहमी प्रमाणे रात्रीच जेवण राज ने अटपवल आणि आता नेहमीप्रमाणे निलेशच्या फोनची वाट बघत बसला. तेव्हढ्यात फोन वाजला

“काय निलेश, जेवण झाल का? “

“नाही”

“अरे किती उशीर, जेवून घेत जा वेळेवर, किती वेळ त्रिशा सोबत बोलणार? “

“हो जेवणारच होतो, विचार करतोय विष खावं म्हणून”

“काय? ! ! काय बोलतोय निलेश, वेडा झालास काय! “

“वेडा नाही रे भोळा आहे मी, तुझ्यावर विश्वास ठेवला, एक मित्र म्हणून तू खरंच खूप नीच निघालास रे, मीच मूर्ख होतो जे तुला मित्र मानलं”

एव्हढं बोलून लगेच कॉल कट झाला, राज पुरता गोंधळून गेला होता. एव्हढयात काय झालं हे कळलंच नाही त्याला, त्याने गाडी काढली आणि तो तडक निलेशच्या घरी गेला

“निल्या, काय झालं? “

“हं. ...काय झालं! असं नको दाखऊस जसं तुला काही माहितीच नाहीये”

“अरे बाबा मला खरंच काही माहित नाहीये, एकदा सांगशील तरी काय झालं ते”

“तू तुझं पोर्टल उघड, आपोआप कळेल काय झालंय ते”

राज ने बऱ्याच दिवसांपासून त्रिशा च पोर्टल उघडलं नव्हतं.

त्याने ते उघडताच त्याला अचानक 200 मेसेज दिसले.

हळूहळू तो एकेक मेसेज वाचू लागला. मेसेज वाचून डोळे फिरायची वेळ आली होती. एक एक मेसेज चक्रावून सोडत होता. नकळत त्रिशा त्याच्यावर प्रलोभीत झालीये एव्हढंच त्यावरून कळत होतं

100 व्या मेसेज मध्ये तिने तर डायरेक्ट त्याला प्रपोजच केलं होतं. त्यानंतर कमीत कमी एक तरी मेसेज कर अशी विनवणी करत होती ती,

आणि 200 वा मेसेज होता, की

“तुझ्या त्या बोलण्याच्या शैलीमुळे मी तुझ्यावर खरंच प्रभावित झाले होते, आतातर जणू तुझ्या प्रेमातच पडलीये, मला माहित आहे की निलेश माझ्यावर खुप प्रेम करतो पण मी त्याच्यावर प्रेम करण्याचं नाटक नाही करू शकत, तू ज्या प्रमाणे मला टाळत आहेस त्यावरून तू माझा कधी होशील असं मला नाही वाटतं, आणि तूच जर का माझ्या आयुष्यात नसलास तर माझ्या आयुष्याला अर्थ तरी काय? , म्हणून मी निलेशला सगळं खरं सांगून या माझ्या निरर्थक आयुष्याला संपवत आहे! “

आता राजला भोवळ आली होती, आणि तिकडे निलेश निश्चलपणे पडलेला होता.

**दुसऱ्याच दिवशी पेपर मध्ये ठळक अक्षरात प्रथम पानावर बातमी होती,**

## 'त्रिशा या भारतीय अँपने डाउनलोडींगचे सर्व रेकॉर्ड तोडले आहेत',

**आणि त्याचं पेपरमध्ये छोट्या अक्षरात बातमी होती,**

'त्रिशा या जगप्रसिद्ध अँप चे निर्माता यांची राहत्या घरात आत्महत्या'

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन
सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान